गुरुवार, २९ डिसेंबर २०२२
किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -१३२
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● THURSDAY 29 DECEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-132 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-08 ● PRICE-5

# अखेर अनिल देशमुख जेलबाहेर



## ढोल ताशांचा गजर, फुलांची उधळण

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि माजी गृहमंत्री अनिल देशमुख आज मुंबईतील आर्थर रोड तुरुंगातून जामिनावर बाहेर आले आहेत. अनिल देशमुखांच्या स्वागतासाठी राष्ट्रवादीचे नेते प्रफुल पटेल, विरोधी पक्षनेते अजित पवार, छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील, सुप्रिया सुळे, जयंत पाटील यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी अनिल देशमुखांवर फुलांचा वर्षाव केला. अनिल देशमुखांनी जेलबाहेर येताच राष्ट्रवादी काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांना पेढे भरवले. यावेळी त्यांनी परमबीर सिंह आणि सचिन वाझेंवर हल्लाबोल केला.**

मला खोट्या आरोपामध्ये फसवण्यात आलेले आहे. परमबीर सिंह यांनी माझ्यावर १०० कोटींचा आरोप लावला होता. त्याच परमबीर सिंह यांनी न्यायमूर्ती चांदिवाल यांच्या समोर जाऊन प्रतिज्ञापत्र दिले. जे आरोप लावलेले आहेत ते केवळ ऐकीव माहितीवर लावलेले आहेत, त्याचे कसलेही पुरावे नाहीत, असे सांगितले. परमबीर सिंह यांच्या जवळचे अधिकारी सचिन वाझे यांनी माझ्यावर आरोप केले होते.

सचिन वाझेवर गंभीर आरोप आहेत, त्याच्या साक्षीवर विश्वास ठेवता येणार नाही. दोन गुन्ह्याचा आरोप आहे, तीनदा निलंबित करण्यात आलेले होते. मुंबईच्या उद्योगपतींच्या घरासमोर बॉम्ब ठेवण्यात आल्याचा आरोप असणाऱ्या व्यक्तीच्या जबाबावर विश्वास ठेवता येणार नाही, असे निरीक्षण हायकोर्टाने नोंदवले. आमचा न्यायव्यवस्थेवर विश्वास आहे, न्यायमूर्तींनी न्याय दिला याबद्दल सर्वांचे आभार मानतो. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांचे आणि पक्षाचे नेते यांचे आभार मानतो, असे अनिल देशमुख म्हणाले. अनिले देशमुख यांनी भारतीय संविधानाचे पुस्तक उंचावले. यावेळी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी भारतीय संविधानाच्या समर्थनार्थ घोषणा दिल्या. आज आम्हाला सगळ्यांना आनंद झालेला आहे. आमचे एक सहकारी तुरुंगात होते. आता बाहेर आल्यानंतर कोर्टाने आदेश दिला आहे ते सर्वजण पाहतील. लोकशाही असो की संविधान असो, आरोप झाल्यानंतर कोर्टात दाद मागितली जाते. अनिल देशमुख आज बाहेर आलेले आहेत, असे अजित पवार म्हणाले. पुरावा नसताना दीड वर्ष तुरुंगात ठेवले होते. संपूर्ण कुटुंबाला त्रास सहन करावा लागतो. विनाकारण तुरुंगात ठेवले जाते. मला देखील अडीच वर्ष तुरुंगात ठेवण्यात आले होते. संपूर्ण देशाने यावर फेरविचार करावा, असे छगन भुजबळ म्हणाले.

## चर्चेतली बातमी

### रिलायन्स जीओची इंटरनेट सेवा ठप्प

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** देशातील सर्वात मोठी टेलिकॉम कंपनी रिलायन्स जीओची इंटरनेट सेवा आज सकाळपासून (बुधवार) ठप्प झाल्याने अनेक युजर्सना अडचणींचा सामाना करावा लागतो आहे. सकाळी १० वाजेपासून जीओचे सर्व्हर डाऊन असल्याची तक्रार अनेकांनी केली आहे. तसेच नेटवर्कमुळे कॉल ड्रॉप होत असल्याचेही अनेकांनी म्हटले आहे. दरम्यान रिलायन्स जीओकडून अद्याप याबाबत कोणतेही स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. डाऊनडिटेक्टरनुसार, सकाळी १० ते ११.३० च्या सुमारास त्यांच्याकडे ४०० पेक्षा जास्त जीओ युजर्सने खराब मोबाईल नेटवर्क, इंटरनेट कनेक्शन आणि कॉल ड्रॉप होत असल्याच्या तक्रारी केल्या आहेत. यापैकी ६० टक्के तक्रारी खराब नेटवर्क मिळत असल्याच्या आहेत. या तक्रारी मुख्यतः मुंबई, चंदीगड, दिल्ली-एनसीआर, बेंगळुरू, कोलकाता यासारख्या मोठ्या शहरांमधून आल्या आहेत. दरम्यान, जीओची सेवा अचानक बंद झाल्याने युजर्सना समस्यांच्या सामना करावा लागतो आहे. अनेकांची कामे ठप्प पडली आहेत. 'वर्क फ्रॉम होम' करणाऱ्यांनीही याचा फटका बसला आहे. याबाबत युजर्सने ट्वीटरच्या माध्यमातून आपला संताप व्यक्त केला आहे.

## मुंबई महापालिकेच्या शिवसेना पक्ष कार्यालयावर शिंदे गटाचा ताबा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महानगरपालिकेच्या मुख्यालयातील शिवसेना पक्ष कार्यालयावर बाळासाहेबांची शिवसेना अर्थात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाने आता ताबा घेतला आहे. आतापर्यंत हे कार्यालय शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडे होते.



नुकतेच नागपूर येथील हिवाळी अधिवशेनात देखील शिंदे गटाने शिवसेनेच्या कार्यालयाचा ताबा घेतला होता. त्यामुळे हे कार्यालय दोन्ही गटांना विभागून देण्यात आले होते. आता मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीची चाहूल लागताच शिंदे गट आक्रमक होताना दिसत आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या पक्ष कार्यालयावर ताबा घेण्यासाठी शिंदे गटाकडून खासदार राहूल शेवाळे, नगरसेवक शीतल म्हात्रे, ठाण्याचे महापौर नरेश म्हस्के, यशवंत जाधव, अशोक जाधव व इतर नेते उपस्थित होते. एकनाथ शिंदे यांनी महाविकास आघाडीमधून बाहेर पडत भाजपासोबत सत्ता स्थापन केल्यानंतर खरी शिवसेना कुणाची? धनुष्यबाण कुणाचा? यावरुन वाद झाला. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालय आणि निवडणूक आयोगाकडे प्रलंबित आहेत. त्यानंतर ठाणे, डोंबिवली अशा अनेक ठिकाणी स्थानिक पक्ष कार्यालय आणि शाखांवर हक्क सांगण्यावरुन दोन्ही गटात वादावादी झालेल्या आहेत. त्यानंतर आता थेट मुंबई महानगरपालिकेतील पक्ष कार्यालयावर हक्क सांगण्यावरुन दोन्ही गटात राडा झाला आहे.

# राजधानी गारठली!



देशाची राजधानी दिल्ली सध्या धुक्यात हरवली असून येथे कडाक्याची थंडी पडली. किमान तापमान 5 अंशांवर पोहोचले आहे. येत्या आठवडाभरातही थंडीची स्थिती अशीच राहणार असल्याची माहिती हवामान खात्याने दिली आहे.

# तर अधिक आनंद झाला असता

## देवेंद्र फडणवीस यांनी मांडली लोकायुक्त विधेयकावर सरकारची बाजू

आधुनिक केसरी न्यूज


नागपूर : नागपूरमधील महाराष्ट्र विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात विरोधकांच्या अनुपस्थित चर्चेशिवाय महाराष्ट्र लोकायुक्त विधेयक मंजूर करण्यात आले. विरोधकांनी शिंदे-फडणवीस सरकारचे मंत्री अब्दुल सत्तार यांच्यावरील घोटाळ्याच्या आरोपावरून सभात्याग केला, असे असताना शिंदे-फडणवीस सरकारने विरोधकांच्या गैरहजेरीत चर्चेशिवायच हे विधेयक मंजूर केले. त्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचा उल्लेख करत विधेयकावर सरकारची बाजू मांडली. ते बुधवारी नागपूर हिवाळी अधिवेशनात बोलत होते.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, या सभागृहाचे मी आभार मानतो की, या सभागृहाने लोकायुक्त विधेयक एकमताने मंजूर केले. खरेतर समोरच्या बाकावरचे लोक उपस्थित राहिले असते तर अधिक आनंद झाला असता. आम्ही या विधेयकावर विरोधकांशीही चर्चा केली होती. त्यामुळे असते तर या विधेयकावरचे एकमत आणखी व्यवस्थित दाखवता आले असते. या निमित्ताने मला निदर्शनास आणून द्यायचे आहे की, केंद्र सरकारने लोकपाल कायदा आणल्यानंतर देशातील राज्यांनी त्याचधर्तीवर लोकायुक्त कायदा मंजूर करावा असे अपेक्षित होते. त्यासाठी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी उपोषण केले होते. तेव्हा मी आणि गिरीश महाजन आम्ही स्वतः अण्णा हजारेंकडे गेलो होतो आणि त्यांना आश्वासित केले होते की, अशाप्रकारचा तुम्हाला अपेक्षित लोकायुक्त कायदा महाराष्ट्र सरकार तयार करेल, अशी माहिती



फडणवीसांनी दिली. हा कायदा करताना आम्हाला विश्वासात घेतले पाहिजे, अशी मागणी अण्णा हजारेंनी केली होती. त्यामुळे सरकारने उच्चस्तरीय समिती तयार केली. त्या समितीत अण्णा हजारे आणि त्यांनी सुचवलेले प्रतिनिधी होते. सातत्याने तो मसुदा अंतिम करण्यासाठी बैठका झाल्या. तसेच त्या समितीने जे बदल सुचवले ते सर्व बदल आपण मान्य केले, असेही फडणवीसांनी नमूद केले.


दरम्यान, असीम सरोदेंनी नव्या लोकायुक्त कायद्यात मुख्यमंत्र्यांची चौकशी परवानगीशिवाय करता येणार नसल्याचा आरोप केलाय. ते म्हणाले, महाराष्ट्रासाठीचा लोकायुक्त कायदा सोमवारी (२६ डिसेंबर) निष्प्रभ करून विधानसभेत मांडला जाणार आहे. यातील तरतुदीनुसार मुख्यमंत्री, मंत्री, अधिकाऱ्यांची चौकशी परवानगी घेऊनच करावी लागणार आहे. मग लोकायुक्तला काय अर्थ राहिला? अण्णा हजारे, विश्वंभर चौधरी, श्याम असावा या समितीतील सदस्यांनी याचा विरोध करावा. तसेच नागरी अधिकारांसाठी बोलावे. सामान्य माणसांना भ्रष्टाचाराविरुद्ध काहीच करता येणार नाही असा तकलादू लोकपाल कायदा उद्या विधानसभेत पास करून घेण्यात येईल. त्यानंतर हाताच्या पंजाची नागफणी करून टीव्ही चॅनेल्सला आपण किती महान लोकायुक्त कायदा आणला अशा मुलाखती दिल्या जातील. त्यामुळे आता लोकशाहीसाठी अनेकांनी हस्तक्षेप करावा, असे मत असीम सरोदे यांनी व्यक्त केले. माझे वृत्तपत्रांना आवाहन आहे की, ताकदवान व प्रभावी लोकायुक्त कायदा असावा यासाठी 'माध्यम-वकिली' करावी, लोकांची बाजू मांडावी, असेही आवाहन असीम सरोदे यांनी केले.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# ' तेच ते ... '

आधुनिक केसरी



दाखवून सांगतात, ' तिथे मिळेल तुम्हाला तो अर्ज. ' मी आपला जातो तिथे. तो विहित नमुन्यातील अर्ज चतकोर कागदावर झेरॉक्स केलेला असतो. झेरॉक्सवाला माझ्याकडून तेवढ्याचे केवळ नाममात्र पाच रुपये शुल्क घेऊन तो अर्ज मला देतो. मला तो अर्ज पाहिल्यावर वाटते, ' अरेच्या ! हे इतकं सोपं आहे होय ! हे तर मी पण एखाद्या कागदावर लिहून देऊ शकतो. कशाला त्या चतकोर कागदाच्या तुकड्यासाठी पाच रुपये घालवायचे ? ' पण हे पुन्हा म्यां पामराचे केवढे अज्ञान ! ' अहो, असा हाताने लिहिलेला अर्ज चालत नाही. तो विहित नमुन्यातच हवा. ' असे उद्गार ( चेहेऱ्यावर मूर्ख कुठला ! असे भाव आणून ) मला ऐकावे लागले असते म्हणून मी तसं विचारण्याची हिंमत करत नाही. खरोखरच असे किती ' विहित नमुने ' आपल्याला असे जागोजागी दिसतात ! आपल्या विद्यार्थ्यांसाठी, शाळेसाठी जीव तोडून, आपली शक्ती, बुद्धी पणाला लावून काम करणाऱ्या डिसले गुरुजी, वारे गुरुजी यांच्यासारख्या ध्येयनिष्ठांना अशाच ' विहित नमुन्यात ' काम केले नाही म्हणून केवढा त्रास भोगावा लागतो. झाडे लावणाऱ्या एखाद्या सयाजी शिंदे सारख्या व्यक्तीला ' विहित नमुन्यात ' अर्ज करून परवानगी घेतली होती का असे विचारले जाते ! खरे तर अशा चाकोरीबाहेर जाऊन काम करणाऱ्या व्यक्तींसाठी प्रशासनाने स्वतःहून मदतीचा हात पुढे केला पाहिजे. पण लाल फितीचा कारभार आणि त्याच्याकडून असली अपेक्षा ! अर्थात अशा चाकोरीबाहेर जाऊन काम करणाऱ्या व्यक्तींना मदत करणारे अधिकारी सुद्धा असतात. तेही त्यांना चाकोरीबाहेर जाऊन मदत करतात. पण अशा अधिकाऱ्यांची संख्या नगण्य. अडवणारेच जास्त. कारण ' विहित नमुना ! ' निवृत्त झालेल्या लोकांना ज्या बँकेत त्यांचं पेन्शन असेल त्या बँकेत नोव्हेंबर महिन्यात जाऊन हयातीचा दाखला द्यावा लागतो. पण एखादी व्यक्ती जर काही कारणाने नोव्हेंबर महिन्यात जाऊ शकली नाही आणि फेब्रुवारी किंवा मार्च मध्ये बँकेत गेली, तर त्या व्यक्तीला नोव्हेंबर महिन्यात तुम्ही हयात होता, तो दाखला हवा असतो. आता जी व्यक्ती फेब्रुवारी किंवा मार्चमध्ये हयात असते ती नोव्हेंबर मध्ये असणारच. पण नियम तो नियम. बँकेचा विषय निघाला म्हणून सांगतो. आमच्या चाळीसगाव मधील काही बँका सेवानिवृत्तांना **क्रमशः**



# आनंदी पहाट

## घराचं घरपण मिळवणे व टिकवणे महत्वाचे

आधुनिक केसरी

आपल्या घराशी असलेलं आपलं नातं आणि गृहसजावटीच्या माध्यमातून केलेली सौंदर्यनिर्मिती आपल्या घराला घरपण प्राप्त करून देत असते. आपण आपल्या कुटुंबीयांचं आपल्याशी असलेलं नातं जसं जपण्याचा प्रयत्न करत असतो तसंच आपल्या घराशी असलेलं नातंही आपण जपत असतो. या नात्यात प्रेमाचा ओलावा असल्यामुळेच आपल्या घरातल्या वातावरणात आपण गोडवा अनुभवत असतो. हे गहिरे नाते-संबंध खरं तर आपल्या प्रत्येक यशस्वी वाटचालीस कारणीभूत असतात. याच कारणामुळे आपण आपल्या कुटुंबाची, आपल्या घराची विशेष काळजी घेत असतो. आपलं आपल्या घराशी असलेलं नातं अधिक धृढ करण्याचा आपण विविध प्रकारे नेहमीच प्रयत्न करत असतो. त्यांपैकी एक म्हणजे गृहसजावट. घराचं घरपण मिळवण्यासाठी आणि ते टिकवण्यासाठी अंतर्गत संरचना आणि सजावट करण्याची जरुरी असते. त्या घराला आपलं म्हणण्यासाठी ते सजवावं लागतं. त्याचं घरपण मिळवण्यासाठी ते खुलवावं लागतं. आपल्या घराचं अंतरंग सजवण्यात आणि खुलवण्यात आपल्या मानसिकतेचा संबंध असल्यामुळे अंतर्मनाचा मोठा वाटा असतो. आपल्या अंतर्मनाच्या सहभागाशिवाय केलेलं अंतर्गत सजावटीचं काम आपल्याच घरात आपल्याला परकेपणा निर्माण करायला कारणीभूत ठरू शकतं. अर्थात अशी एखादीच सजावट अपवादात्मक असू शकते, की जी आपल्या अंतरंगात न डोकावता केली गेली आहे. या माध्यमातून घरात आणलेल्या प्रत्येक वस्तूबरोबर आपलं नवीन नातं निर्माण होत असतं. खरं तर तसं नातं निर्माण होईल अशाच प्रकारे संरचनेचं काम करावं लागतं. हे नातं निर्माण करण्याचं काम अंतर्गत संरचनाकार करत असतो. अनेकदा गृह सजावट करताना केवळ नगास नग याप्रमाणे घरातील वस्तूंचं आणि फर्निचरचं आयोजन केलं जातं. काही वेळा या आयोजनात नियोजनाचा अभाव असतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

**आत्माचि अमर माना | गीता सार ||**
संत सज्जना भजावे | डोळा विठुस पाहावे ||
भक्त पुंडलिक व्हावे | क्षणभर ||१||
भाव मनास जडावा | त्याचा विकार जळावा ||
ज्ञाना-तुका साठवावा | अंतरात ||२||
जागा राहूनी संसारी | होय विरक्त अंतरी ||
जैसा रमतो श्रीहरी | गोपी संगे ||३||
अहंकाराचे ना भय | व्यर्थ जन्म त्याचा जाय ||
जन्म-मरणाचा होय | चाकर तो ||४||
आता ऐक माझ्या मना | देह जीर्ण वस्त्र जाना ||
आत्माचि अमर माना | गीता सार ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


# संत चोखोबांची अभंगवाणी

आधुनिक केसरी

ऊस डोंगा परी रस नव्हे डोंगा । काय भुललासी वरलीया रंगा ॥१॥
कमान डोंगी परी तीर नोहे डोंगा । काय भुललासी वरलीया रंगा ॥२॥
नदी डोंगी परी जळ नव्हे डोंगें । काय भुललासी वरलिया रंगें ॥३॥
चोखा डोंगा परी भाव नव्हे डोंगा । काय भुललासी वरलिया रंगा ॥४॥

# काव्य-चरितावली

## काव्यपुष्प-७ वे



आधुनिक केसरी

गोंदवल्याच्या श्रीमारुतिमंदिरी मुक्कामास
गोसावी, बैरागी, यात्री, संत नि वारकरी येती
भगवंत जाणुनी घेण्या उत्सुकतेने साऱ्यांना
श्रीमहाराज अनेक प्रश्न सहज विचारीती ।।

एक वृद्ध रामदासी म्हणाले, अरे बाळा,एक
संतभेटीसाठी चालु आहे रे माझी भ्रमंती
सद्गुरु भेटीची तळमळ या जीवा लागली
कीर्तनी ,प्रवचनी भावना हीच मी सांगितली ।।

श्रीमहाराज स्वतःच्या मनास समजाविती
घरी बसून आपणास सद्गुरू ना मिळती
श्रीमहाराज विचार पक्का अंतरी करिती
दामोदर, वामनासवे घरा बाहेर पडती ।।

लेकरे न आली घरा, शोध खुप घेतला
परतलेल्या दामोदर ने वृत्तांत कथिला
वामनासवे श्रीमहाराज असे सुखरूप
देवळात हो अंबाबाईच्या कोल्हापुराला ।।

म्हणे- कवी अरूणदास,कृपा असू द्यावी
श्रीसद्गुरुचरणी अक्षरसेवा सदा घडावी ।।



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342



# द्वैतकल्पनानिरसन

आधुनिक केसरी

"दासबोध"या ग्रंथराजाच्या महासागरात एक एक शिंपल्याचा मोती होण्याचं सामर्थ्य प्रत्येक शब्दांत आहे मी तर या साहित्य सागराच्या प्रवाहाचा एक अत्यंत अल्पसा असा थेंब आहे. समर्थानी लिहिते ठेवण्याची प्रेरणा देत रहावी ही श्री चरणीं प्रार्थना
आपल्या सारख्या वाचक मंडळींचे फोन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मसेजेस पाठवणे या सर्वाच्या प्रोत्साहनामुळे लिहिताना बळ मिळते. काही चुकले तर समर्थ क्षमा करतील द्वैतकल्पनानिरसन हा समास लिहायला घेते. माणसाला विचार करण्याचं मुक्त स्वातंत्र्य आहे तो स्वतःतर विचार करतोचं पण आपल्या बरोबर आपलं घर,शेजारी, नातेवाईक, मित्रपरिवार, त्यांच्याही पुढे जाऊन समाजाचा विचार करतो. जीवनात आनंद, श्रद्धा, त्याची मुल्ये,ऊत्तमोत्तम जीवन जगण्यासाठी त्याच्या मनाच्या कल्पना, त्यासाठी करावी लागणारी धडपड यशस्वी होण्यासाठी करावे लागणारे कष्ट,मेहनत,सतत डोक्यावर असणारे सद्विचारांचे गाठोडे & हेसर्व सांभाळत असताना आपल्या सारख्या प्रापंचिक माणसांना घरातील वातावरण,जोडीदाराची मदत फार महत्त्वाची असते.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

द्वैतकल्पनानिरसन या समासात शुध्द कल्पनेपासून स्वतः चे अज्ञान नाहीसे करावे
व जगाचे कल्याण करावे अशा स्वरूपात मोलाचा सल्ला समर्थ देतात. विज्ञानपंडितांनी निर्माण केलेली विलक्षण सुक्ष्म यंत्रे&आपल्या दैनंदिन जीवनात घडून आणलेल्या सुधारणा कल्पनेच्या सामर्थ्यवान विचाराने सिध्द झालेल्या आहेत. समर्थ सांगतात की विनाकारण वेळ वाया घालवण्यापेक्षा माणसाने तो वेळ स्वतः च्या सुधारणेकडे वळवावी. जग बदलण्याची वाट पहात बसण्यापेक्षा स्वतः बदल करावेत.माणूस बदलण्यासाठी त्याचे मन बदलणे गरजेचे आहे. मन कल्पनाप्रधान असल्याने कल्पनांची रचना व त-हा बदलली की मनही आपोआपच बदलते."मी देहच आहे"हा मोठेपणा नाकारून "मी आत्माच आहे "असे समजून मानवी मनातील द्वेत&अद्वैत,ज्ञान&अज्ञान, ब्रम्ह&माया हे सर्व मनच निर्माण करते. शुध्द सात्त्विकता अंगी बाणवून जीवन जगता आले पाहिजे.



# संत सोयराबाई यांचे अभंग

आधुनिक केसरी

अवघा रंग एक झाला । रंगी रंगला श्रीरंग ॥१॥
मी तूंपण गेले वायां । पाहतां पंढरीच्या राया ॥२॥
नाही भेदाचें तें काम । पळोनि गेले क्रोध काम ॥३॥
देही असोनि विदेही । सदा समाधिस्त पाही ॥४॥
पाहते पाहणें गेले दूरी । म्हणे चोखियाची महारी ॥५॥

देहासी विटाळ म्हणती सकळ । आत्मा तो निर्मळ शुद्धबद्ध ॥१॥
देहींचा विटाळ देहीच जन्मला । सोवळा तो झाला कवण धर्म ॥२॥
विटाळावाचोनी उत्पत्तीचे स्थान । कोण देह निर्माण नाही जगीं ॥३॥
म्हणुनी पांडुरंगा वानितसे थोरी । विटाळ देहांतरी वसतसे ॥४॥
देहाचा विटाळ देहींच निर्धारी । म्हणतसे महारी चोखियाची ॥५॥

अहो पंढरीच्या राया । दंडावत तुमच्या पाया ॥१॥
तूंचि उदार त्रिभुवनीं । ऋध्दि सिध्दि तुझे चरणीं ॥२॥
भुक्तिमुक्तिचा तूं दाता । मी तों काय वानूं आता ॥३॥
बैसेन महाद्वारी । म्हणे चोख्याची महारी ॥४॥

# बिहारमध्ये होणार जातीनिहाय जनगणना!

## आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नितीशकुमारांचा निर्णय

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** बिहारमधील नितीशकुमार सरकारने जातीनिहाय जनगणना करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी दोन टप्प्यांत केली जाणार आहे. पहिल्या टप्प्याची सुरुवात येत्या ७ जानेवारीपासून होणार असून या निर्णयाच्या आधारे नितीशकुमार सरकारचा भाजपावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न आहे. केंद्र सरकारने जातीनिहाय जनगणना करण्यास नकार दिला होता. त्यानंतर बिहारमधील सरकार आता स्वखर्चाने ही जनगणना करणार आहे. या जनगणनेमध्ये बिहार सरकारकडून प्रत्येक कुटुंबाची माहिती गोळा करण्यात येणार आहे. मोबाईल ॲप्लिकेशनच्या माध्यमातून ही सर्व प्रक्रिया पार पाडली जाणार असून त्यासाठी शिक्षक, अंगणवाडी सेविका, मनगेरा किंवा जीविका कर्मचाऱ्यांवर ही कामगिरी सोपवली जाणार आहे. सामान्य प्रशासन विभागाने जारी केलेल्या अध्यादेशानुसार ही सर्व प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. या कामासाठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणही दिले जात आहे.



या सर्वेक्षणाचा पहिला टप्पा ७ जानेवारीपासून सुरू होणार आहे. या टप्प्यात प्रत्येक घराला एक क्रमांक दिला जाईल. त्यानंतर त्यांच्याकडून कुटुंबाच्या जातीसंर्भातील माहिती विचारली जाईल. या सर्वेक्षणाचा दुसरा टप्पा पुढील वर्षातील फेब्रुवारी महिन्यात सुरू होण्याची शक्यता आहे. या टप्प्यात कुटुंबाच्या आर्थिक स्थितीविषयीची माहिती गोळा केली जाईल. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून छाननी झाल्यानंतर ही सर्व माहिती मोबाईलमधील ॲपमध्ये साठवून ठेवली जाणार आहे.

जातीनिहाय जनगणना हा राजकीय दृष्टीकोनातून संवेदनशील विषय आहे. याच कारणामुळे आतापर्यंत बिहार सरकारकने या मुद्द्यापासून स्वःतला दूर ठेवण्याचा प्रयत्न केला होता. मात्र आता ही जनगणना लवकरच सुरू होणार असून सर्वेक्षण करणाऱ्या अधिकाऱ्यांना त्यांनी संकलित केलेली माहिती कोणालाही देण्यास तसेच सांगण्यास मनाई करण्यात आलेली आहे. ही संपूर्ण प्रक्रिया जिल्हाधिकारी, समाज कल्याण अधिकारी, जिल्हा सांख्यिकी अधिकारी यांच्या नेतृत्वात पूर्ण केली जाणार आहे. तर जिल्हाधिकारी त्या-त्या जिल्ह्याचे देखरेख अधिकारी असतील. केंद्र सरकारने जातीनिहाय जनगणना करण्याची मागणी फेटाळून लावली होती. या निर्णयाला बिहार भाजपानेही विरोध केला नाव्हता. याच कारणामुळे नितीशकुमार यांनी जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला. भाजपावर कुरघोडी करण्यासाठीचे शस्त्र म्हणून हा निर्णय घेण्यात आला असावा, असा अंदाज लावला जात आहे. बिहार सरकारच्या या निर्णयामुळे आगामी काळातील विधानसभा तसेच २०२४ साली होणाऱ्या लोकसभा निवडणुकीतही हा मुद्दा चर्चेचा विषय राहण्याची शक्यता आहे, असे मत राजकीय जाणकार मांडत आहेत.

# कर्नाटकात येशू ख्रिस्तांच्या पुतळ्याची विटंबना

आधुनिक केसरी न्यूज

**मैसूर :** येशू ख्रिस्तांच्या पुतळ्याची कर्नाटकमध्ये विटंबना केली गेल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. कर्नाटकमधल्या मैसूर या ठिकाणी काही अज्ञातांनी मंगळवारी रात्री उशिरा ही तोडफोड केली. तसंच लहान बाळाच्या रूपात असलेल्या येशू ख्रिस्ताच्या मूर्तीची तोडफोड केली. ख्रिसमस नुकताच थाटात साजरा झाला. त्यानंतर अवघ्या दोन दिवसांतच ही घटना घडली. मैसूरमधल्या पेरियापटना या ठिकाणी असलेल्या सेंट मेरी चर्चमध्ये तोडफोड करण्यात आली. मंगळवारी संध्याकाळी ६ च्या सुमारास ही तोडफोड पाहिली असता चर्चच्या धर्मगुरूंना याबाबतची सूचना देण्यात आली. त्यानंतर पोलीस केसही झाली. पोलिसांनी घटनास्थळी येऊन पाहणी केली. त्यानंतर पोलिसांनी या घटनेची माहिती दिली. ज्यामध्ये बाळ येशू ख्रिस्ताच्या मूर्तीची विटंबना करण्यात आल्याचंही त्यांनी सांगितलं आहे. पोलीस आता या घटनेचं सीसीटीव्ही फुटेज तपासत आहेत. त्याद्वारे हे सगळं कुणी घडवलं याचा शोध घेत आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार हल्लेखोरांनी चर्चमध्ये प्रवेश करण्यासाठी मागचा दरवाजा तोडला. त्यानंतर लाठ्या, काठ्यांनी इथली तोडफोड केली. सीमा लातकर या मैसूरच्या पोलीस अधीक्षक आहेत. त्यांनी ही माहिती माध्यमांना दिली. त्या असंही म्हणाल्या की आम्ही आसपासच्या भागात जे सीसीटीव्ही लावण्यात आले आहेत. आम्ही त्याआधारे हे शोधण्याचा प्रयत्न करतो आहोत. आम्हाला मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, हे सगळं प्रकरण चोरीच्या प्रयत्नातून हा हल्ला करण्यात आला आहे, कारण हल्लेखोर पैसे घेऊन फारार झाले आहेत अशीही माहिती पोलिसांनी दिली. चर्चच्या बाहेर पोलिसांना एक दानपेटीही आढळली आहे.

कर्नाटकमध्ये धर्मांतर केलं जाण्याचं प्रमाण वाढलं आहे त्याच उद्रेकातून ही घटना घडली आहे असंही पोलिसांनी सांगिलतं. गेल्या काही महिन्यांपासून चर्च आणि ख्रिश्चन मिशनरींकडून धर्मांतरण केलं जातं आहे. त्यामुळे धार्मिक आणि राजकीय संघटनांचा रोष त्यांना सहन करावा लागतो आहे. मागच्या शुक्रवारी उत्तराखंड येथील उत्तरकाशी भागात असलेल्या एका ख्रिसमस कार्यक्रमावर एका जमावाने हल्ला केला. या ठिकाणी जबरदस्तीने धर्मांतरण केलं जातं आहे असाही आरोप यावेळी करण्यात आला होता. ही घटना ताजी असतानाच आता कर्नाटकमध्ये एका चर्चवर हल्ला करण्यात आला आहे आणि तिथली येशू ख्रिस्ताची मूर्ती फोडण्यात आली आहे.

# राष्ट्रीय ग्रंथालय असोसिएशनचे मुंबईत भव्य उदघाटन

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** असोसिएशन ऑफ लायब्ररी आणि इन्फॉरमेशन प्रोफेशनल (ALIP) या राष्ट्रव्यापी संघटनेचे उदघाटन दिनांक १९ डिसेंबर २०२२ रोजी सी.के.टी महाविद्यालय, नवीन पनवेल येथे दुपारी २ वाजता दिमाखदार सोहळ्यात करण्यात आले. देशातील १०० पेक्षा अधिक प्राध्यापक, ग्रंथपाल व विद्यार्थी हे महाविद्यालयात हजर होते. ह्या संघटनेचे उदघाटन ग्रंथालय क्षेत्रातील दिग्गज प्राध्यापक डॉ. ए आर डी प्रसाद (डी.आर.टी.सी., बंगलोर ) यांच्या हस्ते करण्यात आले. त्याच बरोबर प्राध्यापक डॉ. विनीत कुमार, बाबासाहेब भीमराव आंबेडकर विदयापीठ लखनऊ हे सुध्दा उपस्थित होते. संघटनेला मार्गदर्शन देण्यासाठी प्राध्यापक डॉ. शशांक सोनावणे, औरंगाबाद येथून आले होते. संघटनेचे नवनिर्वाचित अध्यक्ष म्हणून डॉ. अजय कांबळे यांनी सूत्रे हाती घेतली, उपाध्यक्ष श्री. संतोष पाटील तर सचिव डॉ. भूपेंद्र बनसोड, खजिनदार श्री. मंगेश घोडके, सहायक सचिव डॉ. दिलीप पाटील , सहायक खजिनदार श्री. रमाकांत नवघरे तसेच सभासद डॉ. नंदकिशोर मोतेवार, डॉ. ज्योती भाबळ, डॉ. शिल्पा वाघचौरे, डॉ. युवराज जाधव, डॉ, गणेश कुळकर्णी हजर होते. उदघाटनपर कार्यक्रमात डॉ. ए आर डी प्रसाद यांना संघटनेचे मानद सभासद म्हणून गौरविण्यात आले. त्यावेळी त्यांनी संघटनेने शुभेच्छा देत ग्रंथालय क्षेत्रासाठी भरपूर कार्य करावे असे सुचविले. डॉ. विनीत कुमार यांनी संघटनेच्या कार्यपद्धतीवर विचार व्यक्त करताना सांगितले की, ग्रंथपाल व ग्रंथालय क्षेत्रासाठी अनेक उपक्रम घेण्याची गरज आहे. डॉ. शशांक सोनवणे यांनी सुद्धा ग्रंथालय क्षेत्रात पदार्पण करीत असलेल्या नवीन विद्यार्थ्यांसाठी कार्य करावे असे सुचविले. डॉ. शिल्पा वाघचौरे यांनी संघटनेचे भविष्यकालीन योजनांचा उलगडा केला. डॉ. नंदकिशोर मोतेवार यांना सर्व ग्रंथपाल सहकाऱ्यांना संघटनेत सक्रिय होण्याचे आवाहन केले. डॉ. गणेश कुळकर्णी यांनी ग्रामीण भागातील ग्रंथपालांना येणाऱ्या समस्या मांडल्यात. पहिल्याच दिवशी एकूण ५० उपस्थितांनी संघटनेचे सभासदत्व स्वीकारले. ही संघटना ग्रंथपालांच्या समस्या सोडविण्यासाठी तसेच त्यांना भक्कम उभे राहण्यासाठी कार्य करणार आहे.

# 2 जानेवारी रोजी नंदुरबार येथे जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**नंदुरबार :** सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून 15 ते 29 वयोगटातील युवकांमध्ये एकात्मकतेची भावना जागृत करुन युवावर्गातील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालय,पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा कार्यालय, नंदुरबारच्यावतीने डी.आर.हायस्कुल, नंदुरबार येथे सोमवार 2 जानेवारी, 2023 रोजी दुपारी 2 वाजता जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती, जिल्हा क्रीडा अधिकारी सुनंदा पाटील यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. जिल्हास्तरीय युवा महोत्सव 2022-2023 मध्ये लोकनृत्यासाठी (20 कलाकार संख्या,) व लोकगितासाठी (10 कलाकार संख्या) या दोन प्रकारात हा महोत्सव आयोजित करण्यात येणार आहे. महोत्सवांत सहभागासाठी कलाकार, सहकलाकार, साथसंगत देणाऱ्याचे वय 12 जानेवारी 2023 पर्यंत 15 वर्ष पुर्ण असावे. तर 29 वर्षांपर्यन्त कलाकारासाठी 12 जानेवारी, 2008 ते 12 जानेवारी 1994 नंतरचा जन्म असणे आवश्यक राहील. युवा महोत्सवात सिंथेसाईझार इत्यादी प्रकारामध्ये इलेक्ट्रॉनिक्स वाद्य वापरण्यास तसेच लोकनृत्यासाठी टेप,सीडी, पेनड्रॉईव्ह इत्यादी साहित्य वापरण्यास परवानगी दिली जाणार नाही. नंदुरबार जिल्ह्यातील माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालय तसेच कला व क्रीडा मंडळातील अधिकधिक इच्छुक कलावंतानी युवा महोत्सवामध्ये भाग घेण्यासाठी 30 डिसेंबर, 2022 पर्यंत अर्ज सादर करावे. अधिक माहितीसाठी क्रीडा अधिकारी आत्माराम बोथीकर 8669168483 यांचेशी संपर्क साधावा. असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीमती. पाटील यांनी केले आहे.

# नरेंद्र इंगळे यांना उद्घाटन बहुजन मित्र पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**नागपूर :** ऐतिहासिक प्राचीन विरासत नागलोक चैत्य ५० एकर पुरातत्व इतिहास भुमी इसासणी हिंगणा जिल्हा नागपुर येथे १२ व्या जबरदस्त इतिहास नागलोक परिषद च्या वतीने ग्रामीण युवा संघटनेचे विदर्भध्यक्ष नरेंद्र नवनीत इंगळे यांच्या सामाजिक क्षेत्रात असलेली उल्लेखनीय कामगिरीची दखल घेऊन मा.नरेंद्र नवनीत इंगळे यांना राष्ट्रिय बहुजन मित्र पुरस्कार" देण्यात आला आहे. नरेंद्र इंगळे यांना लहानपणापासूनच सामाजिक कार्याची आवड आहे व त्यानी गेल्या काही वर्षांपासून सामाजिक, आरोग्य, शैक्षिणिक व बेरोजगार तरुणांना रोजगार देण्याचे काम ग्रामीण युवा संघटनेच्या माध्यमातून केले आहे आपल्या देशावर आलेल्या कोरोणा महाभयंकर बिमारी मध्ये सुध्दा नरेंद्र इंगळे रुग्णांची सेवा केली आहे त्यामधे गोरगरिब जनतेला राशन असो वा काही आर्थिक मदत असो दवाखान्यात सुद्धा मदत करत राहता यामध्ये दर ३ मध्ये अनेक ठिकाणी रक्तदान शिबिरे,रोजगार मेळावे, आरोग्य शिबिरे आयोजित करत असतात त्यामुळे अनेकांना त्याचा फायदा होतो.बुद्धिस्ट मॉरीज ब्युरो गेल्या चार वर्षा पासून चालवत आहेत दोनसे पेक्षा जास्त लग्न जुडवले. नरेंद्र नवनीत इंगळे यांनी हे सर्व काम करत तरुणपिढीसाठी एक आदर्श ठेवला आहे.

# आमचा करेक्ट कार्यक्रम करण्याची हिंमत अजितदादांमध्ये नाही

## भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सुनावले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** बारामतीच्या आपल्या एकाच दौऱ्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व विरोधी पक्षनेते अजितदादा पवार यांना इतकी भिती वाटली की, ते माझा करेक्ट कार्यक्रम करायला निघाले आहेत. पण आपला करेक्ट कार्यक्रम करण्याची हिंमत अजितदादांमध्ये नाही. त्यांनी नागपुरात येऊन अशी भाषा करू नये. आपण त्यांचे कोणतेही आव्हान स्वीकारण्यास तयार आहोत, अशा शब्दात भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष मा. चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी सुनावले.

ते नागपूर येथे विधान भवन परिसरात पत्रकारांशी बोलत होते. विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी मंगळवारी केलेल्या टिप्पणीला उत्तर देताना ते बोलत होते. त्यांनी सांगितले की, अजितदादांमध्ये हिंमत आहे आणि ते लढवय्ये आहेत, असा आपला समज होता पण आपल्या बारामतीच्या एकाच दौऱ्याचा त्यांच्यावर इतका परिणाम झाला, त्यांना भिती वाटली आणि ते आपला करेक्ट कार्यक्रम करायला निघाले. अजून काही दौरे होणार आहेत. आपण त्यांचे कोणत्याही पातळीवरील आव्हान स्वीकारण्यास तयार आहोत.

ते म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला काँग्रेससोबत युती करूनही ७५ पेक्षा अधिक जागा विधानसभा निवडणुकीत जिंकता आल्या नाहीत, ते काय आमचा करेक्ट कार्यक्रम करणार ? जनता कोणाचा काय कार्यक्रम करायचा ते ठरवत असते. बारामती शहर वगळता संपूर्ण बारामती लोकसभा मतदारसंघात अजितदादांच्या वागण्याने प्रचंड नाराजी आहे. हुकुमशाहीसारखे वातावरण आहे. प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, आठ आठ दिवस मोबाईल बंद करून भूमिगत होणारे अजितदादा आम्ही पाहिले आहेत. अजितदादांच्या तोंडी करेक्ट कार्यक्रम असे शब्द शोभत नाहीत. त्यांनी विदर्भात येऊन आव्हान देऊ नये.

उपमुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांची तुम्ही बरोबरी करू शकत नाही. त्यांच्यावर टीका करण्यापूर्वी आधी स्वतःच्या पक्षाचा विचार करा, असेही मा. चंद्रशेखर बावनकुळे यांनी अजित पवार यांना सांगितले.



# चीनच्या निणर्याने टेन्शन

आधुनिक केसरी

चीनमध्ये करोना पुन्हा बळावला आहे. याच पार्श्वभूमीवर चीनमधून एक महत्त्वाची अपडेट समोर येत आहे. कोविडसंदर्भातील निर्बंध कमी केल्यानंतर चीन सरकारने लवकरच नवीन पासपोर्ट जारी करण्यास सुरुवात करणार असल्याची घोषणा केली आहे. चीनने २०२० पासून पासपोर्ट देणे बंद केले होते. या निर्णयावर जगभरातून संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. खरे तर जगभरातील पर्यटन उद्योगात चीनमधून येणाऱ्या पर्यटकांचा मोठा वाटा आहे. इतकेच नव्हे तर चिनी नववर्ष साजरे करण्यासाठी मोठ्या संख्येने चिनी नागरिक देशाबाहेर जातात. जे कॅलेंडर वर्षाच्या सुरुवातीलाच येते. अशा परिस्थितीत नागरिकांना पासपोर्ट देऊन चीनमधील नागरिक जगभर फिरू शकतील. मात्र, यासोबतच त्यांच्याद्वारे कोविडचा प्रसार होण्याची शक्यताही आता वाढली आहे. चीन सरकारने पुढील महिन्यात ८ जानेवारीपासून पर्यटकांसाठी सामान्य पासपोर्ट जारी करण्याची प्रक्रिया सुरू करणार असल्याची घोषणा केली आहे. सुरुवातीला चीनच्या नागरिकांना पर्यटन आणि व्यवसायासाठी हाँगकाँगला जाण्याची परवानगी मिळेल. चीनचे नागरिक तेथून इतर देशांमध्येही जाऊ शकतात. अशा परिस्थितीत आशिया आणि युरोपमधील अनेक ठिकाणी चीनमधील नागरिकांची मागणी वाढण्याची शक्यता आहे. यासोबतच चीन ८ जानेवारीपासून देशात येणाऱ्या परदेशी नागरिकांसाठी क्वारंटाईनची अट काढून टाकणार आहे. यापूर्वी, चीनमध्ये महामारीच्या वेळी पर्यटकांना येण्याची परवानगी नव्हती. व्यवसायानिमित्त चीनमध्ये येणाऱ्यांना आठवडाभर क्वारंटाईनमध्ये राहावे लागले. मात्र, आता चीन या अटी हटवत आहे. चीनमधील नागरिकांमध्ये वाढता असंतोष पाहता चीन सरकारने हा निर्णय घेतल्याचे मानले जात आहे. नव्या निर्णयानंतर अनेक चिनी नागरिक देशाबाहेर जाण्याची शक्यता असून जगभरातील पर्यटन क्षेत्राला याचा फायदा होऊ शकतो. त्याचबरोबर या संधीचा फायदा घेऊन अनेकजण चीनबाहेर नवीन संधी शोधू शकतात, अशी शक्यता आहे. खरं तर, २०२२ मध्ये चीन सोडणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढली आहे. यासाठी सरकारची अनिश्चित वृत्ती आणि कडकपणा याला जबाबदार धरले जात आहे. चीनमध्ये सध्या नाही म्हटले तरी कोरोनाचे संकट आहे, त्यामुळे चिनी सरकारच्या या निर्णयाने इतर देशांमध्ये टेन्शन वाढण्याची शक्यता आहे. प्रत्येकानेच करोनामधील त्रासदायक काळ सर्वांनीच अनुभवला आहे. आता पुन्हा त्यासारखी कोणती परिस्थिती ओढवू नये, यासाठी सर्वच देश काळजी घेत आहेत.

# महाराष्ट्राच्या 'धान्य घोटाळ्या'तील बोके?



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

**स्वस्त धान्य दुकानातील धान्य काळाबाजारात नेणारा ट्रक पकडला गेल्याचे वृत्त नुकतच वाचण्यात आले. हा 'धान्य घोटाळा असल्याची पुढे आला.पण धान्य कोठून आणले?यात सहभागी असलेल्या पुरवठा विभागातील अधिकारी,कर्मचाऱ्यांचा शोध घेतला गेला नाही.ही घटना जरी किरकोळ वाटत असावी!पण महाराष्ट्रात गरिबांच्या 'तोंडचा घास' चोरणाऱ्या टोळ्या निर्माण झालेल्या आहेत.राज्यात पुरवठा विभागाच्या संगनमतामुळे करोडो रूपायांचे धान्य घोटाळे होत आहेत.पण राजकीय नेत्यांना याची खंत वाटत नाही,याचे आश्चर्य वाटते.भारतात व राज्यात अनेक घोटाळे गाजले. त्याचे पुढे काय झाले?**

केवळ घोटाळ्यांची चर्चा व गाजावाजा होतो.नंतर आपणही विसरू जातो.घोटाळे होतच असतात! यात न काय नवल ? याची आपणाला सवयच झाली आहे.पण पुरोगामी महाराष्ट्रात गरिबांच्या धान्यात घोटाळे होतात,तेंव्हा शरमेने मान खाली जाते.गरिबांच्या 'धान्यात घोटाळा' म्हणजे माणुसकीला कलंकच आहे.

ब्रिटीश सरकारने १९३९ मध्ये रेशनिंगची पध्दत सुरु होती. नंतर १९५१ मध्ये सार्वजनिक वितरण व खाद्यान्न बाबतचे सामाजिक धोरण निर्माण केले गेले.या धोरणानुसार गरिबांना अन्नधान्य पुरवठा करणे,साठेबाजार, काळाबाजारावर नियंत्रण ठेवण्याचा निर्णय घेतला गेला.१९६५ मध्ये सार्वजनिक वितरण प्रणाली तयार केली गेली व धान्य पुरविण्यासाठी भारतीय खाद्य महामंडळाची स्थापना केली.१९८४ मध्ये खाद्य व नागरी पुरवठा विभागाची निर्मिती झाली.केंद्र शासनाने जून१९९७ मध्ये लक्ष्य निर्धारित वितरण व्यवस्था गरिबांवर केंदींत करण्याचा निर्णय घेतला. तेंव्हापासून राज्यांना तांदुळ व गव्हाचे वितरण केले जाते. सार्वजनिक वितरण व्यवस्था ही केंद्राची योजना आहे.या योजनांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी राज्य सरकारवर आहे.महाराष्ट्रात २३ नोव्हेंबर १९६६ पासून सार्वजनिक व्यवस्था अमंलात आली आहे. राज्यस्तरावर अन्न व नागरी पुरवठा विभाग आणि विभागीयस्तरावर आणि जिल्हा- स्तरावर पुरवठा विभागामार्फत स्वस्त धान्य दुकानांमार्फत गोर-गरिबांना स्वस्त दराने धान्य पुरवठा करण्यात येत असतो.राज्यात १ मे १९९९ पासून तिहेरी शिधापत्रिका( कुपनकार्ड ) योजना लागू करण्यात आली. यात दारिद्र्यरेषेखालील कुटुंबासाठी पिवळे, तर एक लाखाच्या आत वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबाला केसरी तर एक लाखाच्या वर उत्पन्न असेलेल्या कुटुंबाना पांढरे कुपनकार्ड दिले जाते.राज्यात शिधापत्रिकाचा संख्या २ कोटी ५६ लाख इतकी आहेत.यात २०२१ मध्ये पिवळे कार्ड- धारकांची संख्या ६३ लाख२९ हजार तर केसरी कार्डधारकांची संख्या१ कोटी ७० लाख ६२ हजार,तर पांढरे कार्डधारक,असे एकूण संख्या २ कोटी ५६ लाख ३४ हजार इतकी आहे.राज्यात २००५ ते २००८, २००९ ते २०१०,२०११ पर्यंत शिधापत्रिकांचा शोध घेतला गेला.तेंव्हा सुमारे ५४ लाख ६ हजार ८१ शिधापत्रिका बोगस आढळून आल्या होत्या.तहसील कार्यालयात राजकीय नेते,प्रसिध्द क्रिकेटपटूंच्या नावाने शिधापत्रिका तयार करून देण्याचे प्रकार घडलेले आहेत. गरिबांना पिवळे व केसरी कुपनधारकांना धान्य दिले जाते. राज्यात ५२ हजार ५५७ स्वस्त धान्य दुकानदारांमार्फत धान्य वितरण केले जाते. योजनेत गरीब कुटुंबाना गहू, तांदुळ, दाळ, साखर, रॉकेल आदी वस्तु देण्याचा उल्लेख आहे.पण प्रत्यक्षात या वस्तु अनेक वर्षापासून गायब आहेत. केंद्र शासनाने२००१ पासून अंत्योदय योजना सुरु केली. यात ३५ किलो, ए.पी.एल.कुपन-धारकांना १५ किलो धान्य देण्याचा निर्णय घेतला. देशात काँग्रेसने राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना २०१३ मध्ये लागू केली. त्यानुसार प्रतिव्यक्ती ५ किलोप्रमाणे धान्य दिले जाते. यातील तांदूळ- २ रुपये, गहू - १ किलो हे नाममात्र दर आहेत. यात सात कोटी लोकांना लाभ देण्यात येत आहे. तसेच मराठवाडा व विदर्भातील शेतकऱ्यांसाठी राष्ट्रीय अन्न योजनेच्या धर्तीवर धान्य येते. कोरोनाच्या संकटात मोदी सरकारने २०२० मध्ये देशातील ८० कोटी तर राज्यातील ७ कोटी गरिबांना मोफत धान्य देण्याची योजना सुरु केली. या योजनेची मुदत नोव्हेंबर २२ मध्ये संपली होती. त्या योजनेला पुन्हा एक वर्षाची मुदत वाढ देण्यात आली आहे. त्यावर केंद्र शासन २६ हजार कोटी खर्च करत असल्याचा दावा आहे. राज्य शासनाच्या २०२०-२०२१ च्या आर्थिक अहवालात केंद्राने राष्ट्रीय अन्न सुरक्षा अंतर्गत, अंत्योदय योजना, पंतप्रधान गरीब कल्याण योजना, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाना लाखो टन गहू आणि तांदुळाचे वितरण केले आहे.पण राज्य सरकार व दुकानदारांनी धान्य वितरण केलेल्या आकडेवारीत तफावत दिसत आहे.यात भरड धान्य म्हणून ज्वारी, मका, बाजरी ज्वारी केंद्राने दिल्याची आकडेवारी आहे. पण राज्यात भरड धान्याचे वितरण कोठेही झालेले दिसत नाही. मग हे धान्याचे वितरण कोठे झाले ? हे राज्याच्या पुरवठा विभागालाच माहित असावे.राज्यात नवीन शिंदे व भाजपा सरकार येताच गरिबांना दिवाळीत 'आंनदाचा शिधा' म्हणून एक किलोच्या पाच वस्तूंची पिशवी शंभर रूपायाला देण्यात आली.या वस्तुंचे योग्य वाटप झाल्या नसल्याची तक्रारी होत्या. त्या धान्याच्या पिशवीवर पंतप्रधान,मुख्यमंत्री शिंदे,उपमुख्यमंत्री फडणवीस यांची 'छबी' पहावयाला मिळाली. देशात गरीब कोणाला म्हणावे? हे निश्चित नाही. १९७७ मध्ये गरीब माणसाची सीमा रेषा ठरविण्यासाठी ' दारिद्र्य टोपली'ची संकल्पना आणली गेली.किमान दोन वेळेस अन्नाची टोपली भरू न शकणारा गरीब समजावा, असे निश्चित केले गेले. नंतर अनेक समित्यांचे गठन करण्यात आले, यात. २००९ मध्ये सुरेश तेडूलकर समितीने दारिद्र्य रेषेबाबतचा जो अहवाल मान्य केला गेला. यात ग्रामीण भागात प्रतिमहा खर्च ४९ रू. ९ पैसे शहरी भागात दरडोई प्रतिमहा खर्च ५६रूपये ६४ पैसे खर्च करणारा गरीब मानला गेला. परंतु २०११ पासून देशात व राज्यात दारिद्र्यरेषेचे सर्वेक्षण झालेले नाही. दारिद्र्यरेषेच्या यादीत धनदांडगे घुसलेले आहेत. खरे गरीब कुटुंब मात्र धान्यपासून वंचित आहेत. देशात एकूण ३७. २ टक्के दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाना धान्य व आरोग्य इतर सर्व शासकीय सेवा मोफत दिल्या जातात.केंद्र व राज्य शासनाच्या गरिबांना अन्नधान्य देणाऱ्या अनेक योजना आहेत. पण या योजनांचा गरिबांना किती लाभ मिळतो?योजनेच्या धान्य वितरण व्यवस्थेत गोंधळ,भ्रष्टाचार वाढत चालला आहे. यात पुरवठा विभाग व दुकानदार हे गरीब माणसाचा धान्यासाठी खेटे मारावे लावतात,त्यांची आर्थिक लूट करतात.अनेक वेळा पशुही खाणार नाही, असे धान्य असे सडलेले,किडे असलेल धान्य दिले जाते. ग्राहक संरक्षण कायद्यानुसार स्वस्त धान्य दुकानदारांनी किंमतीचा फलक व पावती देणे बंधनकारक आहे. हे दुकानदार पावतीच देत नाहीत.यात प्रशासकीय यंत्रणा व दुकानदार हे कायद्याचे उल्लंघन करत आहेत.राज्यात धान्य वहातुकीचा ठेका मिळावा यासाठी धनदांडगे धडपड असतात. कारण यात धान्याच्या 'हेराफेरी' करून करोडो रुपये कमाई करण्याचा धंदा बनला आहे.नांदेड येथील दोन पुरवठा ठेकेदारांचा वाद मंत्रालय व न्यायालयापर्यंत गेला होता. नांदेडचे तहसील कार्यालयात तर कामे दलालामार्फत होतात !. एका गरीब कुटुंबाला कुपन केवळ लिंक केल्याचे कारण देत तीन वर्षे धान्य दिले गेले नाही.ही वस्तुस्थिती आहे. या गरीब माणसाच्या दखल घेतली गेली नाही.शासकीय योजनांचा गरिबांना लाभ मिळावा,यासाठी राजकीय नेते कार्यकर्ते प्रयत्न करत नाहीत.त्यांना समाजकारणापेक्षा राजकारणात अधिक रस आहे. महाराष्ट्रात स्वस्त धान्य दुकानांच्या धान्यात कोट्यवधी रुपायांचे घोटाळे झालेले दिसून येतात.पुरवठा विभागाच्या संगनमताने धान्यात भ्रष्टाचार होत असतो,हे अहवालातून निष्पन्न झालेले आहे.यात नागपूर येथे २०१५ मध्ये दुकानदारांनी ३० हजार क्विंटल धान्य काळाबाजात विक्री केले.या धान्याची १७७ कोटी होती.यात तर तहसीलदार गोदाम तपासणीसाठी कधीच गेलेले नव्हते.परभणी येथे २०१६ मध्ये १९ हजार १४१ क्विंटल परस्पर विकल्याची प्रकरण उजेडात आले.हा आकडा ५ कोटीचा होता.२०१० मध्ये सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यात १८९ कोटीचे धान्य विक्री केले.या हा घोटाळा ११उपजिल्हाधिकारी पथकाने उघडकीय आणला होता.नांदेड येथे २०१९ मध्ये शासकीय गोदामातील १९ ट्रक धान्य काळ्याबाजारात नेताना पोलिसांना पकडले होते.यात ११ मोठे व्यापारी,एक उपजिल्हाधिकाऱ्याला अटक केली गेली.यात ईडीला हस्तक्षेप करावा लागला. तसेच नाशिक येथे ७ कोटीचा घोटाळा गाजला होता.तासगाव (सांगली) टाकळी ढोकेश्वर(अहमदनगर) सिंधुदुर्ग, मिरज, कुर्डवाडी आदी ठिकाणी स्वस्त धान्य दुकानाच्या धान्यांचा काळाबाजार झाल्याच्या घटना आहेत. प्रशासनाने २०२१ केलेल्या चौकशीत १८६ दुकानाचे परवाने रद्द तर २०९ परवाने निलंबित केले.तर राज्यात ५८८ धाडी टाकण्यात आल्या, त्यात १०१ गुन्हे नोंदविले गेले. यात ८१३ जणांना अटक केली गेली. या धाडीत जप्त केलेले धान्याची किंमत १३० कोटी ३७ लाख, ५०८१ रूपये असल्याची माहिती शासकीय अहवालात आहे. यावरून धान्य घोटाळ्यांची गंभीरता लक्षात येते. यात ठेकेदार, व्यापारी,शासकीय अधिकारी, कर्मचारी बोक्यांची साखळी तयार केली आहे. पण या साखळितील म्होरक्यांचा शोध घेतला जात नाही. तेंव्हा गरिबांच्या धान्यावर डाका टाकणाऱ्यांच्या विरोधात मोका लावणे,त्यांची मालमत्ता जप्त करणे,तडीपार केले पाहिजे. तसेच या टोळीविरोधात जीवनावश्यक वस्तु कायद्यांर्गत कठोर शिक्षा देण्याची तरतूद केली गेली तरच हे धान्य घोटाळे थांबतील!


# माझा मराठाचि बोलू कौतुके।

आधुनिक केसरी

**(मागील अंकावरून)**

प्राचार्य म्हणून काम उत्तम प्रकारे पाहिले. सुमारे २८ वर्षे ते अनेक ठिकाणी प्राचार्य म्हणून कार्यरत होते. पुढे मराठवाडा विद्यापीठात अधिसभा, विद्या परीषद आणि कार्यकारणी सदस्य म्हणून त्यांनी भरघोस असे रचनात्मक कार्य केले. मराठवाडा प्रदेशातील शैक्षणिक समस्यांची त्यांना चांगली जाण असल्यामुळे कुलगुरू डॉ. विठ्ठलराव घुगे हे परदेशात गेले असता ज्येष्ठ अधिष्ठाता यानात्याने त्यांनी विद्यापीठाचे प्रभावी कुलगुरू म्हणून दोन वेळा कुशलतेने कार्यभार सांभाळला. आणि या काळात त्यांनी चांगले निर्णय घेतले. वृतपत्र विभागाचा विभाग प्रमुख कार्य करताना या काळात मला कुलगुरू डॉ. घुगे व अधिष्ठाता व प्राचार्य ठाले सर यांचे मार्गदर्शन लाभत असे.

**साहित्य परिषदेचे आधारवड :** कौतिकराव सरांनी प्राचार्य पदाची धुरा सांभाळताना त्यांनी आपल्या मराठी भाषा व साहित्याची नाळ तुटू दिली नाही. ते साहित्यिक उपक्रमांचा सातत्याने पाठपुरावा करत असत. १९९५ साली 'मुक्तिसंग्राम' या ग्रंथाच्या संपादन प्रसंगी त्यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली. सर्वांना बरोबर घेऊन लोकशाही पद्धतीने कार्य करण्याची त्यांची पद्धती सामुदायिक जबाबदारीच्या तत्वावर आधारलेली असते. त्यामुळे मराठी साहित्य परिषदेचे कार्यवाह म्हणून त्यांनी सलग तेरा वर्ष काम पाहिले. या काळात कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे हे या परिषदेचे अध्यक्ष होते.



कुलगुर डॉ. नागनाथ कोत्तापले हे ही प्रतिष्टान मासिकाचे संपादक म्हणून सक्रीय होते. पुढे ठाले सरांनी अध्यक्ष पदाची दुरा घेतली आणि ते आजपर्यंत कार्य उत्तम प्रकारे पार पाडत आहेत. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अधिवेशन अंबड. उडंणगाव, उदगीर तसेच जालना इत्यादी ठिकाणी मराठवाड्याच्या ग्रामीण भागात भरविण्यात त्यांनी यथार्थ मार्गदर्शन केलेले आहे. ग्रामीण भागातील कवी, लेखक, कथाकार, कादंबरीकार यांच्या उपक्रमशील व सृजनसील साहित्य निर्मितीकडे त्यांचे बारकाईने लक्ष असते. त्यांच्या नेतृत्वगुणामुळे अखिल भारतीय साहित्य महामंडळाचे ते तीन वेळा कार्यवाह होते आणि त्यांनी सातत्याने सहा वर्षे अध्यक्षपद भूषविले.२८ वर्षांपासून ते मराठी साहित्य महामंडळाचे सदस्य आहेत. त्यांच्या कुशल नेतृत्वगुणामुळे आणि अभ्यासू वृत्तीमुळे ते दिल्लीच्या साहित्य अकादमी या शिखर संस्थेचे पाच वर्ष सदस्य होते. तसेच नॅशनल बुक ट्रस्ट या शिखर संस्थेवरील सल्लागार समितीचे सदस्य म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. राज्य सरकारच्या मराठी भाषा समितीला ते सतत मार्गदर्शन करत असतात. प्रा. नरहर कुरुंदकर यांनी 'हिरवी क्षितिजे' या ग्रंथात साहित्य परिषदेचे कार्य हा एक विस्तृत असा चिकित्सक लेख लिहिला होता. त्यामध्ये त्यांनी प्रादेशिक साहित्य परिषदेबद्दल ज्या अपेक्षा व्यक्त केल्या होत्या. त्या पूर्ण करण्याचे कार्य प्राध्यापक ठाले सर यांनी बजावले आहे. वाङमयीन भाषा आणि संस्कृती यासंबंधी त्यांनी लिहिलेला ग्रंथ सखोल चिंतन व अनुभवावर आधारलेला आहे. साहित्य संमेलनाचे नियोजन व व्यवस्थापन याबाबत ठाले सरांचा हात कोणीही धरू शकणार नाही. त्यांनी करोना काळात नाशिक येथील साहित्य संमेलनात विशेष प्रयत्न करून हे संमेलन यशस्वी केले होते. त्यामुळे सर्व अडचणीतून मार्ग काढण्याचा 'ठाले फार्मूला' सर्वांना पुढे घेऊन जाणार असतो. २००४ साली औरंगाबाद येथील देवगिरीच्या परिसरात ७७ व्या साहित्य संमेलनांचे ते कार्याध्यक्ष होते. हे संमेलन आजही लोकांच्या लक्षात आहे. फेब्रुवारी २००९ मध्ये अमेरिकेतील सँनहॉजे येथे झालेल्या पहिल्या मराठी विश्व साहित्य संमेलनाचे आयोजन त्यांनी भव्य आणि तेवढेच सुनियोजित व आकर्षक पद्धतीने केले होते. नामवंत साहित्यिक डॉ. गंगाधर पानतावणे हे या संमेलनाचे अध्यक्ष होते. या संमेलनाच्या नियोजनातील त्यांची कामगिरी इतिहासात नोंदविली पाहिजे. मराठी साहित्य संमेलन स्थानिक असो वा आंतरराष्ट्रीय असो, त्याचे यशस्वी नियोजन पाच ते सहा महिन्यापासून अगोदर कसे करावे आणि त्यांची आखणी कशी करावी, याबाबत त्यांची कार्यपद्धती ही वैशिष्ट्यपूर्ण ठरली. साहित्य मंडळाला संमेलनाच्या आखणीसाठी यथायोग्य मार्गदर्शन करण्यात कौतिकराव ठाले यांच्या व्यवस्थापन कौशल्याचे त्यामुळेचं कौतुक केले जाते. पक्ष, जात, पंथ यांचा पूर्वग्रह न ठेवता ते संमेलनाच्या परिसंवादाचे 'निखळ गुणवत्तेच्या' आधारे नियोजन करतात. मराठी भाषेला राजभाषा दर्जा मिळवून देण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले आहे. त्यांनी परिषदेमध्ये यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाची उभारणी कुशलतेने केली. जेष्ठ पत्रकार ओ साहित्यिक अनंतराव भालेराव यांचा पुतळा औरंगाबाद कार्यालयात त्यांच्या प्रयत्नाने उभा राहिला आहे. त्यांना नागपूर येथील 'मॅग्नम' फाउंडेशनचा राष्ट्रीय पुरस्कार लाभला आहे. तसेच माहूरगड येथील महाकवी 'विष्णुदास पुरस्कार' परळी वैजनाथ येथील 'साहित्य भूषण' पुरस्कार इत्यादी पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आलेले आहे. अशा प्रकारे त्यांनी मराठवाडा साहित्य परिषदेच्या कार्य संस्कृतीची ध्वजा उंच फडकवट ठेवली आहे. संत ज्ञानेश्वर म्हणतात.

पुढती पुढती पुढती । इया ग्रंथपुण्य संपत्ती । सर्व सुखी सर्वभूती । संपूर्ण होईजो ।। (ज्ञानेश्वरी अध्याय, १८ :१८०९ )

या ग्रंथाच्या पूर्णरूप संपत्तीने सर्व प्राणीमात्रांचा उत्तरोत्तर संपूर्ण सुख प्राप्त व्हावे, उत्कर्ष व्हावे, अशी प्रार्थना केली आहे. ज्ञानदेवाच्या या प्रार्थने प्रमाणे कौतिकराव ठाले पाटील यांचा कार्याचा सुगंध भविष्यात महाराष्ट्रात दरवळत राहील आणि महाराष्ट्र साहित्य व संस्कृतीचे सारस्वत प्रकाशमान करण्यात तरी हि त्यांच्या अर्धांगिनी कवयित्री अनुराधा पाटील यांचे योगदान मोठे आहे. त्यांच्या असंख्य चाहत्यांच्या व विद्यार्थ्यांच्या शुभेच्छा त्यांच्या भावी जीवनात बळकटी देणाऱ्या ठरतील यात शंका नाही. जीवेत् शरदः शतम्

डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# जीवनाची लय बिघडवणाऱ्या आभासी लाटा



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**वैवाहिक संबंधात दुरावा हा आज समाजाच्या चिंतेचा विषय बनला आहे. समाजाच्या प्रत्येक स्तरावर कुटुंबे तुटताना दिसत आहेत. मनाशी जोडण्याची भावना हरवत चालली आहे. संवादहीन सोबत ही आता प्रत्येक घरातली सामान्य गोष्ट झाली आहे. केवळ संभाषणच नाही तर भावनाही लोप पावत चालल्या आहेत. नवरा-बायको विचित्र अशा व्यस्ततेत अडकले आहेत. घरात हजर असलेली आणि अगदी शेजारी बसलेली व्यक्तीही प्रत्यक्षात घरात असूनही अनुपस्थित असते. गंमत अशी की, ज्या स्मार्ट फोनने आपल्या जवळच्या आणि प्रिय व्यक्तींचे हित जाणून घेण्याची सुविधा दिली आहे, तोच आता जवळच्या नात्यांमध्येही दुरावा निर्माण करत आहेत.**

आपल्याला जगाशी जोडण्याची सुविधा देणारा स्मार्टफोन आपल्याला आपल्या प्रिय व्यक्तींपासून आणि आपल्या सभोवतालपासून दूर करत आहे. आभासी जगात प्रशंसा शेअर करणाऱ्या आणि गोळा करणाऱ्या तरुणांना भावना आणि जबाबदाऱ्यांच्या आघाडीवर अनावश्यकपणे मागे ढकलण्यासाठीची परिस्थिती निर्माण करत आहे.

'स्मार्टफोन आणि त्याचा मानवी संबंधांवर होणारा परिणाम - 2022' या विषयावर करण्यात आलेल्या अभ्यासात सत्तर टक्के लोकांनी कबूल केले आहे की ते त्यांच्या जोडीदारासोबत वेळ घालवतानाही फोनमध्ये डोकावत राहतात. ऐंशी टक्के लोकांनी सांगितले की ते त्यांच्या जोडीदाराशी उत्स्फूर्त संभाषण करण्यात कमी वेळ घालवू शकले, परंतु त्यांना हवे असल्यास जास्त वेळ घालवता आला असता. समोरासमोर बसणे चांगले असूनही स्मार्टफोनच्या अतिवापरामुळे जोडीदारासोबतचे नाते बिघडते, असे या अभ्यासात सहभागी असलेल्या 88 टक्के लोकांचे मत होते. या अभ्यासात दिल्ली, मुंबई, कोलकाता, चेन्नई, हैदराबाद, बंगळुरू, अहमदाबाद आणि पुणे या शहरांमध्ये राहणाऱ्या लोकांचा समावेश करण्यात आला. वास्तविक, स्मार्टफोनमुळे मानवी उत्स्फूर्तता आणि दिनचर्या या दोन्हींवर वाईट परिणाम झाला आहे. संवादाचे आणि माहितीचे माध्यम म्हणून आलेल्या फोनने लोकांचे आयुष्य वेधून घेतले आहे. प्रत्येक वयोगटातील लोक या उपकरणासह बराच वेळ घालवत आहेत. याच अभ्यासातून असे दिसून आले आहे की विवाहित वापरकर्ते फोनवर दिवसाचे सरासरी 4.7 तास घालवतात. हा कालावधी पती-पत्नी दोघांसाठी समान आहे. म्हणजेच दोघेही खऱ्या जगाऐवजी आभासी जगाला वेळ देत आहेत. 73 टक्के लोकांनी आपल्या जोडीदाराकडे ही तक्रार व्यक्त केली आहे की ते फोनमध्ये जास्त गुंतलेले असतात.

किंबहुना, ही केवळ आकडे समजून घेणे आणि तपासणे एवढीच बाब नाही. स्मार्टफोनच्या अतिवापराचा खरोखरच लोकांच्या विचारांवर आणि वागण्यावर विपरित परिणाम होत आहे. याच अभ्यासानुसार, 70 टक्के लोक जेव्हा त्यांचा स्मार्टफोन पाहताना त्यांचा जोडीदार त्यांना काही तरी बोलतो तेव्हा ते अस्वस्थ होतात. चिडतात. यावरून आता तर किरकोळ वादही घरा घरात तापू लागले आहेत, यात आता नवल राहिलेले नाही. दुर्लक्ष आणि उपेक्षेची भावनादेखील अनेक गुन्हेगारी घटनांना कारणीभूत ठरत आहे. गेल्या वर्षी, एका सतरा वर्षांच्या किशोरने केवळ फोन घेण्यासाठी आपल्या पत्नीला राजस्थानला नेले आणि ओडिशाच्या बोलंगीर जिल्ह्यातील एका पंचावन्न वर्षाच्या व्यक्तीला विकले. दोन महिन्यांपूर्वीच हा विवाह झाला होता. सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रेमात पडल्यानंतर त्या युवकाने त्या चोवीस वर्षीय तरुणीशी लग्न केले होते.

त्याने स्मार्टफोनसाठी केवळ विचार-संवेदना विकल्या नाहीत, तर आयुष्यभराच्या नात्याशी निगडित भावनाही विकल्या. 2016 मध्ये अमेरिकेतील लास वेगासमध्ये राहणाऱ्या एका व्यक्तीने आपल्या स्मार्टफोनबरोबरच लग्न केल्याची धक्कादायक बातमी समोर आली होती. फोनसोबत लग्न करणाऱ्या व्यक्तीने सांगितले होते की, 'लोक त्यांच्या फोनशी इतके जोडलेले असतात की ते नेहमी फोनसोबतच असतात आणि लग्नासारखंच वाटतं.' लोक फोनसोबत झोपतात, उठतात आणि बसतात.'

अशा स्थितीत 'स्मार्टफोन आणि मानवी संबंध' या ताज्या सर्वेक्षणातील आकडेवारी ही लोकांचे वैवाहिक जीवन फोनपर्यंतच मर्यादित राहिल्याचे सांगून ही लोकांच्या जीवनाची ब्लू प्रिंट मांडते. निःसंशयपणे, गरजेपोटी व्यसनाधीन होण्याची परिस्थिती म्हणजे स्मार्ट फोन आणि प्रेमळ संवादाच्या घट्ट वर्तुळात मानवी समज कुंठित होत असल्याचे कटू वास्तव आहे.

आभासी जगातच सगळा वेळ निघून चालल्याने अगदी प्रौढ लोकांची मूलभूत गोष्टी आणि परिस्थितींबद्दलची समज कमी झाली आहे. स्मार्टफोनमध्ये हरवलेल्या व्यक्तींची आकडेवारी वैयक्तिक आयुष्याशी संबंधित असली तरी त्याचा परिणाम संपूर्ण सामाजिक-कौटुंबिक व्यवस्थेवर होत आहे, ही चिंताजनक बाब आहे. मोठ्यांशी संवाद साधण्यापासून ते मुलांच्या संगोपनापर्यंत सगळ्याच गोष्टींवर परिणाम होत आहे. आता डेटिंग ॲप्सपासून व्हर्च्युअल



दुनियेतील विचित्र नातेसंबंधांपर्यंत सर्वत्र विवाहितांची उपस्थिती दिसून येत आहे.

एकीकडे घटस्फोटाचे आकडे वाढत आहेत, तर दुसरीकडे विवाहबाह्य संबंधांचे गुन्हेही समोर येत आहेत. जोडीदाराकडून होणारे दुर्लक्ष पती-पत्नी दोघांमध्ये भावनिक दुरावा घडवून आणत आहे. यासोबतच सध्या सुरू असलेली चर्चा किंवा सोशल मीडियावरील व्यस्तताही शंका-कुशंका निर्माण करण्याचे कारण ठरत आहे. केवळ महानगरांमध्येच नव्हे तर, मोबाईलच्या अतिवापरामुळे विवाहित जोडप्यांमधील वादाची प्रकरणे दुर्गम भागातील पोलीस ठाण्यांपर्यंत पोहोचत आहेत.

एकीकडे मुलांना वेळ देण्याऐवजी पालक आपल्या लहान मुलांच्या हातात स्मार्टफोन देत आहेत आणि दुसरीकडे ते स्वतःच त्यांच्या वृद्ध पालकांपासून दूर जात आहेत. 'द लिबर्टी इन लाइफ ऑफ ओल्डर पीपल 2022' या दहा शहरांच्या सर्वेक्षणात, जवळपास 65 टक्के ज्येष्ठ नागरिकांनी सांगितले की, मोबाईल फोन आणि इतर तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यामुळे तरुण पिढीशी त्यांच्या वैयक्तिक संवादावर परिणाम झाला आहे. 72.5 टक्के ज्येष्ठ मंडळींनी मान्य केलं आहे की त्यांच्या पिढीतील लोक कुटुंबातील ज्येष्ठांसोबत जास्त वेळ घालवत. दुसरीकडे, पालक आणि मुलांवर केलेल्या मिशिगन विद्यापीठाच्या जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या ताज्या अभ्यासानुसार, स्वत नव्या तंत्रज्ञानात अडकलेले पालक आपल्या रडणाऱ्या मुलाला शांत करण्यासाठी स्मार्टफोन, आयपॅड सारखी डिजिटल उपकरणे देतात. हे मुलाचे वर्तन चुकीचे आहे. मुलांची मनःस्थिती झपाट्याने बदलण्यामागचे कारण डिजिटल उपकरणांमध्ये मग्न होणे हे आहे.

मुलांमध्ये वाढलेला उदासपणा आणि आनंदाचा आवेग यांसारख्या लक्षणांचे परीक्षण करताना, संशोधकांना असे आढळून आले की लहान मुले जेव्हा रडतात तेव्हा डिजिटल उपकरणांमध्ये गुंतल्याने पुढील आयुष्यात मुलांच्या वर्तनावर विपरीत परिणाम होतो. विशेषतः मुले स्वतःवर नियंत्रण ठेवण्यास शिकत नाहीत. इतर अनेक अभ्यास देखील दर्शवतात की स्मार्टफोनमुळे मुले आक्रमक आणि आत्मकेंद्रित होत आहेत. नवीन पिढीची योग्य आणि निरोगी संगोपन ही देखील वैवाहिक जीवनातील एक महत्त्वाची जबाबदारी आहे. वैवाहिक जीवनाशी संबंधित अनेक समस्यांचे कारण म्हणजे जोडीदाराशी अर्थपूर्ण संवादाचा अभाव. कुटुंबात अर्थपूर्ण चर्चेची गरज आहे. एकमेकांना वेळ दिल्याशिवाय नात्यात संवाद आणि उत्स्फूर्तता येऊ शकत नाही. या अभ्यासाचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे बहुतेक लोक स्मार्टफोनच्या अतिवापराचे तोटे समजून घेत आहेत. स्मार्टफोनचे तोटे लक्षात घेऊन 90 टक्के लोकांनी अर्थपूर्ण संभाषण करून जोडीदारासोबत चांगला वेळ घालवण्याची इच्छाही व्यक्त केली आहे. अशा स्थितीत स्मार्टफोनच्या वापरातही स्वयं-नियमन आवश्यक आहे. हे समजून घेणे आवश्यक आहे की कोणत्याही तांत्रिक सुविधेने जीवन सोपे केले पाहिजे, कठीण नाही.

# नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (२०२०) – समजून घेण्याची दिशा-दृष्टी



डॉ. मारोती तेगमपुरे
संपर्क क्र. ९४२३९९३१३७

आधुनिक केसरी

**के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखालील नवीन शैक्षणिक धोरणातील (२०२०) पाचवीपर्यंतचे मातृभाषेतून शिक्षण, तीन ते अठरा वयोगटाचा शिक्षण हक्क कायद्यांतर्गत करण्यात आलेला समावेश, शिक्षणावर सकल राष्ट्रांतर्गत उत्पन्नाच्या ६ टक्के खर्चाची भूमिका या खऱ्या अर्थाने नवीन शैक्षणिक धोरणातील जमेच्या बाजू म्हणाव्या लागतील. मुळात पाचवीपर्यंतचे शिक्षण मातृभाषेतून देण्यात येईल, असे या शैक्षणिक धोरणात म्हटले आहे, असे सर्वत्र म्हटले जात आहे. परंतु नवीन शैक्षणिक धोरणातील मूळ प्रस्तावात वेगळेच काहीतरी म्हटले आहे. ते म्हणजे 'जेथे शक्य असेल तेथे मातृभाषेतून शिक्षण दिले जाईल.' ही झाली एक बाजू. दुसरी बाजू अशी की, यापूर्वी १९६४- ६६ मध्ये कोठारी शैक्षणिक आयोगाने याविषयीची स्पष्ट मांडणी केलेली असून त्यामध्ये म्हटले आहे की, त्रि-भाषा सूत्राची अंमलबजावणी करून मातृभाषा, राष्ट्रभाषा आणि संपर्क भाषा (इंग्रजी) या भाषा मुलांना शिकवण्यात याव्यात.**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये (२०२०) सर्व तऱ्हेने सर्वांना नमवणारे/पराभूत करणारे असे केंद्रीकरण करण्याचे ठरवले आहे. उच्च शिक्षणामध्ये राज्यांना अगदी अल्प भूमिका किंवा कसलीच भूमिका ठेवलेली नाही. असे म्हणालो तर अतिशयोक्ती ठरणार नाही. राज्यांनी फक्त या नवीन शैक्षणिक धोरणाची अमलबजावणी करायचे, एवढेच काम काय ते त्यांच्या वाट्याला आलेले आहे. सर्वोच्च स्थानी असलेल्या उच्च शिक्षण मंडळासोबत (HECI) बहुकेंद्रीय संस्था तयार करण्याचा प्रस्ताव एनईपीमध्ये आहे. त्यामध्ये उच्चशिक्षण मंडळाला राष्ट्रीय उच्च शिक्षण नियंत्रण मंडळ (NHERC) हे नियंत्रण ठेवण्यासाठी मदत करेल. राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळ (NAC) हे संस्थांची दर्जा निश्चिती करेल. उच्च शिक्षण अनुदान मंडळ (HEGC) हे अनुदान देण्याचे काम करेल आणि अनुदान मंडळ शिक्षण (GEC) हे शैक्षणिक प्रक्रियेच्या फलनिष्पत्ती मानकांची निश्चिती करेल. फलनिष्पत्तीचे मूल्यमापनदेखील केंद्रीय पद्धतीने केले जाईल आणि हे केंद्रीय मूल्यमापन शिक्षण संस्थांचे मानांकन, अधिस्वीकृती आणि अनुदान निश्चित करेल. अशा संस्थांवर शिक्षणतज्ज्ञांची व नामांकित व्यक्तींची निवड करण्यात येईल, अशी फार मोठी चर्चा करण्यात येत आहे. परंतु सरकारची त्यात फार मोठी भूमिका म्हणजे त्यांच्या मर्जीतील व्यक्तींचीच निवड करण्यात येईल हे स्पष्ट आहे.

शिक्षणविषयक चर्चा करीत असताना आपण विविध दृष्टीकोनाची चर्चा करीत असताना यामध्ये विकासवादी दृष्टीकोन आणि मार्क्सवादी दृष्टीकोन यावर अधिक भर देतोत. मार्क्सवादी दृष्टीकोनासंदर्भात मांडणी (अण्णा सावंत) करताना चार प्रमेयांचा विचार आपणास करता येईल. यामध्ये शिक्षण व्यवस्था त्या देशातील समाजरचनेचाच एक भाग असते, जशी समाजव्यवस्था तसे त्याचे प्रतिबिंब शिक्षण व्यवस्थेत दिसून येते. दुसरे म्हणजे शिक्षण व्यवस्थेचा उगम व विकास हा समाजातील वरचढ वर्गाच्या / सत्ताधारी वर्गाच्या गरजेतून आणि हितासाठी होत असतो. तिसरे प्रमेय असे की, कोणतीही शिक्षणव्यवस्था त्या समाजाच्या उत्पादन व्यवस्थेशी अनुकूल असते. आणि शेवटचे प्रमेय म्हणजे शिक्षणव्यवस्था ही वरच्या वर्गाचे प्रभुत्व/वर्चस्व टिकविण्याचे कार्य करते. या चार प्रमेयाच्या आधारे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाकडे (२०२०) कुठे उभे राहून बघितले पाहिजे ती दिशादृष्टी प्राप्त होऊ शकेल असे मला वाटते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण विषयक विचार मांडताना आपणास सर्वसमावेशी दृष्टी दिलेली आहे. (नागोराव कुंभार) जो विचार, जी अपेक्षा त्यांनी व्यक्त केलेली आहे ती अपेक्षा या धोरणाच्या माध्यमातून पूर्णत्वास जाणार आहे का? हा कळीचा मुद्दा असणार आहे. बाबासाहेब म्हणाले होते. "शिक्षण समाजाभिमुख असावे, ते विज्ञाननिष्ठ आणि पक्षपात विरहित असावे. कोणत्याही विशिष्ट समाजघटकाच्या हित सापेक्ष नसावे. शिक्षणाचा उद्देश वस्तुस्थितीपूरक माहिती पुरविणे किंवा काही सिद्धांत शिकविणे हा नसावा तर विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित होईल, त्यांच्या मानसिक, बौद्धिक क्षमतांची वाढ होईल, प्रस्थापित अधिकारी विद्वानांच्या विचारांचे टीकात्मक परीक्षण करण्यास




ते समर्थ होतील, प्रथम सूत्राचा शोध घेऊन ते आवश्यक माहिती मिळविण्याचा प्रयत्न करतील, त्यांच्या मनात कोणत्याही विषयाविषयी जिज्ञासा निर्माण होऊन त्याद्वारे सखोल अध्ययनाच्या प्रवृती विकसित होतील. त्याचप्रमाणे सत्याचा शोध किती अवघड आहे याची त्यांना जाणीव होईल, तरीही त्या मार्गावर जाणे किती आवश्यक आहे, हे त्यांना जाणवेल. एखाद्याने व्यक्त केलेले मत आणि वस्तुस्थिती यातील अंतर ते जाणू शकतील. समस्या जाणून घेऊन प्रत्येक समस्येचे नेमकेपण त्यांच्या लक्षात येईल. प्रत्येक समस्येचे निदान केल्यानंतर गुणावगुणांचे विश्लेषण करण्याची क्षमता निर्माण होईल, सूचविण्यात आलेल्या विचारांची वा संकल्पनांची सत्यासत्यता पडताळून पाहण्याची दृष्टी त्याला यावी. या विश्लेषणातून काय निष्कर्ष निघतो याचा त्यांनी विचार करावा. एखाद्या विचाराचा किंवा संकल्पनेचा स्वीकार किंवा अस्वीकार करण्यापूर्वी त्याने विवेकनिष्ठ विचार करावा. मौलिक स्वरूपाचे शोधकार्य करणारा विद्यार्थी होण्यापेक्षा मौलिक संशोधन कशा प्रकारे केले जाते हे जाणून घेणे अधिक महत्त्वाचे आहे, याची जाणीव त्यांना व्हावी. त्यांनी उपलब्ध पुराव्याचे योग्य मूल्यमापन करावे. त्याने तर्काचा पाठपुरावा करावा. त्यावर टिका करावी, या सर्वांसाठी विद्यार्थ्यांच्या क्षमता विकसित करणे हे विद्यापीठ शिक्षणाचे ध्येय असावे." नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा (२०२०) विचार करीत असताना बाबासाहेबांच्या उपरोक्त मतास केंद्रस्थानी ठेऊन विचार झाल्यास या धोरणाच्या माध्यमातून कोणाचे हित साधले जाणार आहे याविषयीची काहीएक कल्पना येऊ शकेल.

अन्न,वस्त्र आणि निवारा या तीन गरजा बरोबरच शिक्षण ही सुद्धा मुलभूत गरज आहे. व्हिक्टर व्ह्युगो म्हणतो की, "जो मनुष्य शाळेची दरवाजे उघडतो, तो तुरुंगाची दरवाजे बंद करतो." उलट अर्थाने हे विधान आज सत्यात उतरल्याचे पहावयास मिळत आहे. शिक्षणाच्या खाजगीकरनांमुळे शाळा-महाविद्यालयाचे दरवाजे बंद झालेले असल्यामुळे किंवा विशिष्ट घटकासाठीच खुले असल्यामुळे तुरुंगाची संख्या वाढवावी लागत असून ही भविष्याच्या दृष्टीने अंधारयुगाची सुरुवात असणार आहे. यासर्व घटकांचा साकल्याने विचार केल्यानंतर आपणास या धोरणाचा प्रतिकार करणे गरजेचे असून राजर्षी शाहू महाराज म्हणाले होते. "गवताच्या एकेका काडीची ताकद जास्त नसते,पण काड्यांचा वेठ वळला तर त्याने हत्तीलाही बांधता येते. म्हणून मजुरांची संघशक्ती आवश्यक आहे." नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा प्रतिकार उपरोक्त पद्धतीने आपल्याला एकजुटीने-एकदिलानेच करावा लागेल.

**डॉ. मारोती तेगमपुरे**
**अर्थशास्त्र विभागप्रमुख, गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना-४३१२०४**
**संपर्क- ९४२३९९३१३७**

# हिवाळी अधिवेशनात मातंग समाजाच्या मागण्यांवर चर्चा होणार का ?

## लोकस्वराज्य आंदोलनचे प्रदेशाध्यक्ष ॲड. नितीन पोळ यांचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना सवाल

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** महाराष्ट्र राज्यात सुमारे 60 ते 70



विधानसभा मतदारसंघात निर्णायक भूमिका हाताळणारा मातंग समाज आजही मागासलेल्या अवस्थेत आहे. समाजात शिक्षणाचे प्रमाण खूप कमी आहे, परिणामी तरुणांना नोकऱ्या नाहीत. गेल्या अनेक वर्षांपासून समाजाच्या मागण्या शासन दरबारी प्रलंबित आहेत. जो समाज जागृत नसतो त्याच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असते, त्या समाजाची कुणीही दखल घेत नाही, अशीच परिस्थिती मातंग समाजाची आहे. आज कुठलाही राजकीय पक्ष या समाजाची दखल घ्यायला तयार नाही, गेल्या काही वर्षांत समाजावर जातीयवादी हल्ले वाढले आहेत. या गोष्टीकडेही शासन कानाडोळा करीत आहे. सध्या महाराष्ट्र विधान सभेचे हिवाळी अधिवेशन नागपूर येथे सुरू आहे. सरकारने या अधिवेशनात अनेक पुरवणी मागण्या मांडल्या असून त्यावर रोज जोरदार चर्चा होत आहेत. पण या अधिवेशनात मातंग समाजाच्या प्रामुख्याने ज्या मागण्या आहेत त्यात प्रामुख्याने अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ गेल्या अनेक वर्षांपासून बंद अवस्थेत असून यावर्षी महामंडळाला तुटपुंजी आर्थिक तरतूद केली आहे, मात्र मागील दोन वर्षात कोरोनासाठीच्या आजाराने मागासवर्गीय खात्याचा विकास निधी अन्यत्र वळवला असून या तुटपुंज्या आर्थिक तरतुदींने अनुशेष भरून निघणार नाही त्यामुळे वाढीव निधी करता चर्चा होणे अपेक्षित आहे. सामाजिक न्यायाची संकल्पना प्रत्यक्षात येण्यासाठी बार्टीची स्थापना केली गेली मात्र या संस्थेतून जाणीवपूर्वक मातंग व तत्सम जाती वंचित राहत आहेत. त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून विविध संघटनाकडून आर्टीची मागणी होत आहे, त्यासाठी विशेष निधी उपलब्ध व्हावा म्हणून चर्चा होणे अपेक्षित आहे. मातंग व तत्सम जातीच्या मुलामुलींमध्ये शैक्षणिक जाणीव होत असून शासकीय वसतिगृहात जाणीवपूर्वक मातंग समाजाच्या मुलांना डावलले जाते, त्यासाठी निवास वस्तीगृहाची निर्मिती करिता निधी मिळावा म्हणून चर्चा होणे अपेक्षित आहे. क्रांतिवीर लहुजी साळवे अभ्यास आयोगाने 67 शिफारशी मंजूर केल्या त्यातील बऱ्याच तरतुदींना आर्थिक निधी उपलब्ध नाही, यावर चर्चा होणे अपेक्षित आहे. मातंग समाजाच्या तरुणांना व्यावसायिक संधी उपलब्ध व्हावी म्हणून व्यवसायिक प्रशिक्षण केंद्र तयार व्हावे म्हणून आर्थिक तरतुद व्हावी या साठी चर्चा व्हावी. RTE शिक्षण तरतुदीतून मातंग समाजाच्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या प्रवेश सुलभ व्हावा यासाठी विशेष निधी उपलब्ध करून घ्यावा यासाठी चर्चा व्हावी, ग्रामीण भागात पंतप्रधान आवास योजना, रमाई घरकुल योजना, शबरी घरकुल योजना या धर्तीवर मातंग व तत्सम 11 जातींसाठी स्वतंत्र घरकुल योजना निर्माण करून त्यासाठी विशेष तरतूद व्हावी, अनुसूचित जाती आरक्षण वर्गीकरण या विषयावर चर्चा होऊन मातंग तत्सम जातींसाठी स्वतंत्र निधी उपलब्ध व्हावा, सत्य शोधक अण्णा भाऊ साठे व क्रांतिगुरु लहुजी साळवे स्मारक उभारणीच्या कामाला गती मिळावी म्हणून आर्थिक तरतूद व्हावी, मात्र समाज घटक म्हणून निवडून गेलेले लोक प्रतिनिधी या कोणत्याच विषयावर आजून तरी चर्चा करताना दिसत नाही, अशी खंतही ॲड. नितीन पोळ यांनी व्यक्त केली. ते पुढे म्हणाले की समाजाच्या न्याय मागण्या मान्य झाल्या नाहीतर येणाऱ्या काळात मातंग समाज रस्त्यावर उतरून शासनाला घाम फोडल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा ॲड. नितीन पोळ यांनी प्रसिद्धीपत्राद्वारे दिला आहे.



# शरद जोशी मंच शेतकरी संघटनेच्या औरंगाबाद जिल्हाध्यक्षपदी काशिनाथ जाधव यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** काशिनाथ जाधव हे औरंगाबाद जिल्ह्यामध्ये राज्य उत्पादन शुल्क या विभागात दुय्यम निरीक्षक म्हणून त्यांनी पूर्ण जिल्ह्यात काम केले असल्यामुळे त्यांच्या कामाचा नक्कीच या संघटनेला फायदा होईल म्हणून त्यांना जिल्हा अध्यक्षपदी नियुक्ती देण्यात आली आहे. तसेच काशिनाथ जाधव यांनी डिव्हिजनमध्ये विभागीय भरारी पथक या विभागात प्रभारी निरीक्षक म्हणून दोन वर्ष आठ जिल्ह्यात विशेष कामगिरी केली आहे त्यांच्या पाठीमागे जनसेवाचा मोठा अनुभव आहे व त्यांचा पूर्ण जिल्ह्यात जनसंपर्क सुद्धा वाढलेला आहे. वानेगाव येथील श्री काशिनाथ पारुबा जाधव यांची शरद जोशी विचार मंच शेतकरी संघटना ची औरंगाबाद जिल्हा अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल वाणेगाव येथे सत्कार करताना सर्वश्री बाबुराव पाटील जाधव, सुखदेव पाटील जाधव, मनोहर तात्या, कारभारी पाटील जाधव, गणेश पाटील जाधव, अवचित राव जाधव, मंगेशराव सोटम, रावसाहेब सोटम, विशंभरराव निकम, संजय पाटील गायकवाड, रामकृष्ण पा. भोकरे, तुकाराम पाटील भोकरे, प्रमोद डांगे, पत्रकार सुधकर जेठे व इतर मान्यवर उपस्थित होते.

# सांगलीचे माजी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. बुरुटे यांचा जीवनगौरव पुरस्काराने सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** येथील क्रांतीसूर्य फौंडेशन यांच्या वतीने नुकताच कोल्हापूर येथे डॉ. पांडुरंग बुरुटे व त्यांच्या पत्नी डॉ. शैलजा बुरुटे यांना राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. राष्ट्रपिता महात्मा फुले स्मृतीदिन व शिक्षक दिनाचे औचित्य साधून माजी मंत्री, आमदार हसन मुश्रीफ, इंडियन डेअरी असोसिएशन दिल्ली चे अध्यक्ष व थायलंडचे वाणिज्य सल्लागार चेतन नरके, आणि साई उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत पाटील, दादा कौलवकर यांच्या हस्ते डॉक्टर बुरुटे दांपत्याच्या जीवन कार्याचा हा यथोचित गौरव करण्यात आला. यावेळी फौंडेशनचे अध्यक्ष विशाल मोरे, उपाध्यक्ष विजय दाभाडे, सर्व पदाधिकारी, मान्यवर, शिक्षक व नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. डॉ. बुरुटे हे शेगाव येथील रहिवासी असून त्यांनी सांगलीचे जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून काम पाहिले आहे. ते महाराष्ट्र राज्य आरोग्य सेवेतून सहायक संचालक पदावरून नुकतेच सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या जीवन कार्यावर आधारित 'झेप' हा चरित्र ग्रंथ प्रकाशनाच्या वाटेवर आहे. ते शेगाव येथील बालभारती पाठ्यपुस्तकातील कवी महादेव बुरुटे यांचे जेष्ठ बंधू आहेत.



# १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त प्राध्यापक व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करा : डॉ. दिलीप अर्जुने



आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शिक्षण क्षेत्र आणि शिक्षकांच्या समस्यांचे निराकरण प्राथमिकतेने करण्यासंदर्भात मान्य करण्यात आलेल्या प्रस्तावांमध्ये आवश्यक पदभरती, तात्पुरत्या स्वरूपाच्या तासिका तत्व, कंत्राटी, तदर्थ इत्यादी नियुत्तया पूर्णपणे बंद कराव्या. सातव्या वेतन आयोगाची देशभरात एक समान अंमलबजावणी करावी. आणि १ जानेवारी २००४ पूर्वी अस्तित्वात असलेली जुनी पेन्शन योजना सर्वांसाठी अंमलात आणावी यासारख्या अनेक महत्त्वपूर्ण मुद्द्यांचा समावेश निवेदनात करण्यात आला. या मागणीसाठी शैक्षिक महासंघाने राज्यव्यापी स्वाक्षरी अभियान राबवण्याचा संकल्कप केला तरी या संदर्भात शासनाने सकारात्मक पाऊले उचलावीत अन्यथा शैक्षिक महासंघ संलग्नित राज्यभरातील विविध संघटना आंदोलन उभारणी करतील असा इशाराही यावेळी देण्यात आला. सर्व कर्मचाऱ्यांना एकसारखी जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी या मागणीसाठी दि.२६/१२/२२ रोजी प्रो. डॉ. सतिष देशपांडे (सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग, औरंगाबाद) यांना निवेदन देण्यात आले. यावेळी प्रोफेसर डॉ. दिलीप अर्जुने, प्रोफेसर डॉ. सत्यप्रेम घुमरे, डॉ. संदीप जगताप, डॉ. प्रशांत नेतनकर, डॉ. भरत सलामपुरे, गोविंद कदम, डॉ. भगवान डोके, डॉ. महानंदा दळवी, डॉ. निलेश देगांवकर आदींनी निवेदनावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

# अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या अध्यक्षपदी गोकुळसिंग राजपूत



आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील गोकुळसिंग राजपूत यांची अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या सोयगाव तालुका अध्यक्ष म्हणून राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीपबाबा खांडापूरकर लातूर यांच्या हस्ते नुकतेच निवड करण्यात आली.याविषयी सविस्तर माहिती अशी की, मौजे कुंभारी या. जामनेर जि.जळगांव येथे 24,25 डिसेंबर रोजी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राज्यस्तरीय अभ्यास शिबीर संपन्न झाले आहे. अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन स राज्यस्तरीय या शिबिरात प्रमुख पाहुणे म्हणून अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. प्रदीप पाटील खंडापूरकर (बाबा), माजी सभापती बबलूशेट भन्साळी फत्तेपूर,महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अरूण देशमुख यांचे हस्ते अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे औरंगाबाद व सोयगाव तालुका अध्यक्ष म्हणून यांची निवड करण्यात आली असून त्यांना नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले आहे. या दोन दिवसीय आयोजित शिबिरात भ्रष्टाचाराच्या प्रकरणात उपस्थित पदाधिकारी यांना सविस्तर माहिती देण्यात आली. यावेळी राष्ट्रीय समन्वयक गिरीराज महिराज राष्ट्रीय सरचिटणीस अमोल नानजकर, राष्ट्रीय उपाध्यक्ष शोभाताई बल्लाळ, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अरुण देशमुख अजिंठा, प्रदेश महिला अध्यक्षा ऍड राणीताई स्वामी, प्रभाकर साळवे प्रदेश सरचिटणीस म.रा, औरंगाबाद महिला अध्यक्षा अंजनाताई राजपूत अजिंठा, श्रावण कुळे, प्रदेश युवती अध्यक्ष शेख सनाताई पेठ, मराठवाडा विभाग प्रमुख पंडित तिडके, सोयगाव तालुका अध्यक्ष चेतन राठोड, शेख अज्जर फर्दापूर, यांचे सह मान्यवरांनी गोकुळसिंग राजपूत यांना शुभेच्छा दिल्या.

# थकीत वेतन मिळावे म्हणून कर्मचाऱ्यांचे आमरण उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील विनायक सहकारी साखर कारखाना गेल्या २०-२२वर्षापासून बंद आहे,या कारखान्याचे कर्मचारी गेल्या २० वर्षांपासून थकीत वेतन मिळावे म्हणून लढा देत आहेत,परंतु या कर्मचारी वर्गाच्या लढ्याची आजपावेतो कोणीही दखल घेतली नाही,साखर आयुक्त,सहकार मंत्री याना भेटून ही उपयोग झाला नाही , ,शेवटी ही संघटना मा,उच्च न्यायालयातधाव घेण्यात आली,मा,उच्च न्यायालायने वेतन अदा करण्याचे निर्देश दिले आहेत, मात्र अद्यापही या कर्मचारी वर्गाला थकीत पगार नाही ,गेल्या २० वर्षांपासून हे साखर कामगार कसा बसा आपला उदर निर्वाह करीत आहेत,शासनाचे या मागणी कडे लक्ष वेधण्यासाठी हे साखर कामगार आपल्या कुटुंबीयसोबत येथील उपजिल्हाधिकारी कार्यलय समोर आमरण उपोषण ला सोमवार दि.२६/१२/२२



पासून आमरण उपोषणाला बसलेले आहे, कुटुंबीय धरून जवळपास २००साखर कामगार आमरण उपोषण करत आहेत), तालुका पेंशनर्स शाखेचे अध्यक्ष धोंडीरामसिंह राजपुत,यांनी या साखर कामगार उपोषण स्थळी भेट देऊन त्यांना पाठींबा दिला, या समयीअध्यक्ष एस, जी, भराडे,मराठवाडा ई,पी,एस, निवृत्त कर्मचारी संघाचे मराठवाडा उपाध्यक्ष भास्कर मतसागर, उपाध्यक्ष ए,डी. चव्हाण, सचिव जयराम उगले यांच्या सर्व कुटुंबीय कामगारसुध्दा उपोषणात सहभागी झालेले आहेत.

# आनंदी जीवनासाठी ताण –तणावाचे व्यवस्थापन गरजेचे : राऊत



आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील पहूर येथे दि.२८/१२/२२ रोजी आनंदी जीवन जगण्यासाठी ताण - तणावाचे सुयोग्य व्यवस्थापन करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयाचे क्रीडा विभागप्रमुख हरिभाऊ राऊत यांनी केले. आर. बी. आर. कन्या विद्यालयात आयोजित ६ व्या केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेत ते बोलत होते. दैनंदिन जीवन जगत असताना ताण-तणाव येणे स्वाभाविक आहे , परंतु सुयोग्य व्यवस्थापना द्वारे आपण तणावग्रस्त परिस्थितीतून बाहेर येऊन जीवनाचा खरा आनंद घेऊ शकतो, असेही ते म्हणाले. प्रारंभी सरस्वती पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान आर बी आर कन्या विद्यालयाचे मुख्याध्यापक सुधीर महाजन यांनी भूषविले . यावेळी जिल्हा मुख्याध्यापक संघातर्फे आयोजित वक्तृत्व स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त केल्याबद्दल नेहा सुनील देशमुख या विद्यार्थिनीचा गौरव करण्यात आला. शिक्षण विस्तार अधिकारी विजय सरोदे यांनी यावेळी सखोल मार्गदर्शन केले. गोकुळ महाजन यांनी शिष्यवृत्ती परीक्षेतील गणित विषयाची तयारी कशी करावी ? याविषयी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक सुवर्णा मोरे यांनी केले. सूत्रसंचालन चंद्रकांत सोनाळकर यांनी केले. आभार केंद्रप्रमुख भानुदास तायडे यांनी मानले. यावेळी विषय तज्ज्ञ पंकज रानोटकर यांनी मनोगत व्यक्त केले . माझी आदर्श शाळा या विषयावर लेले नगर प्राथमिक विद्यामंदिर येथील शिक्षक महेश मोरे यांनी शाळेत राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांविषयी मार्गदर्शन केले. यावेळी पहूर केंद्रातील सर्व शिक्षक मुख्याध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यशस्वीतेसाठी आर. बी.आर. कन्या विद्यालय, संतोषी माता नगर प्राथमिक शाळा आणि हिवरी - हिवरखेडा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# संत साहित्यातून मानवाला दृष्टी प्राप्त होते : भगवान राईतकर

आधुनिक केसरी न्यूज

**मेहकर :** संत साहित्यातून मानवाला दृष्टी प्राप्त होते.



त्यामधून त्याला जगामधील चांगल्या आणि वाईट गोष्टीची जाणीव होते. तसेच, खरं काय आणि बरं काय? , चांगलं काय ? आणि वाईट काय ? हे समजते. प्रामाणिक प्रयत्नांच्या माध्यमातून माणसाला यश प्राप्त करता येते. परंतु, यशस्वी जीवनासाठी संत साहित्याची आणि संतांच्या विचाराचे आचरण करण्याची गरज असल्याचे मत संत साहित्याचे अभ्यासक व जेष्ठ पत्रकार भगवान राईतकर यांनी विशेष श्रमसंस्कार शिबिरामध्ये दत्तक ग्राम दुधा येथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले.

भगवान राईतकर हे पुढे बोलताना म्हणाले की, सकल संतांनी लिहिलेल्या संत साहित्याच्या आचरणाने मानवी जीवनामध्ये शाश्वत सुखाची प्राप्ती होते. कर्मयोगी संत शुकदासजी महाराजश्री संस्थापित विवेकानंद आश्रम द्वारा संचालित विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालय, हिवरा आश्रम च्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिरामध्ये दत्तक ग्राम दुधा या ठिकाणी बौद्धिक सत्रामध्ये 'यशस्वी जीवनासाठी संत साहित्याची गरज' या विचारावर बौद्धिक सत्रामध्ये भगवान राईतकर हे बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष विवेकानंद विज्ञान महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा.अमोल शेळके उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना राष्ट्रसेवेचे धडे दिले जातात, असे विचार प्रा. अमोल शेळके यांनी अध्यक्षीय भाषणामध्ये व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. ज्ञानेश्वर गाडे यांनी केले. तर, सहकार्यक्रम अधिकारी प्रा. गजानन ठाकरे यांनी यावेळी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुक्ता बांगर हिने स्वागत गीत गायले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गायत्री काळबांडे आणि भाग्यश्री गुगळे व आभार प्रदर्शन पल्लवी वाघ या विद्यार्थिनींनी केले. यावेळी विशेष श्रमसंस्कार शिबिरातील विद्यार्थ्यांनी व विद्यार्थ्यीनींनी या बौद्धिक सत्राचा लाभ घेतला.

# भाजपा नगरसेविका पती प्रमोद पाटीलसह आजी-माजी सैनिकांवर जीवघेणा हल्ला

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** भाजपा नगरसेविका पती प्रमोद पाटील व यांच्यासह पाच ते सात जणांकडून आजी-माजी सैनिकांवर जीवघेणा हल्ला करण्यात आला असल्याचा आरोप पिढीतांसह त्रिदल सैनिक सेवा संघाच्या वतीने करण्यात आला आहे. तक्रार करूनही आवश्यक ते कलमे पोलीस प्रशासन लावत नसल्याने अखेर त्रिदल सैनिक सेवा संघाच्या माध्यमातून या आजी-माजी सैनिकांनी आमरण उपोषणाचे हत्यार उपसले आहे. पुरवणी जबाब घेऊन भा. द. वि.कलम वाढवून या संबंधित आरोपींना अटक करावी अशी मागणी देखील यावेळी करण्यात आली आहे. धुळे तालुक्यातील नावरी या ठिकाणी माजी सैनिक अतुल नामदेव शिरसाठ, वडील नामदेव शिरसाट, सेवार्थ सैनिक शरद काकुळीथ हे तिघे मौजे नकाणे येथे अतुल शिरसाट यांच्या सासरी व गोरख देवचंद पाटील यांच्या घरी अतुल शिरसाट यांच्या पत्नीला घेण्यासाठी गेले असता त्यांच्या पत्नीने त्यांच्यासोबत येण्यास नकार दिला त्यावेळेस घरातून बाहेर निघताना नगरसेविका पती प्रमोद पाटील, नानाजी भास्कर पाटील, बाजीराव पाटील, विक्री पाटील, गुलाब पाटील, अन्य चार ते पाच जणांनी रस्त्यावर आढळून शिवीगाळ करत चाकूने लोखंडी रॉड व दगडाने मारहाण करून जीव घेणा हल्ला चढविला. या हल्ल्यात शरद काकुळीथ, यांच्यावर चाकूने वार करण्यात आला तर अतुल नामदेव शिरसाठ यांच्या डोक्यावरही लोखंडी रॉडने वार करण्यात आला त्यांच्या खिशातील काही रक्कमही काढून घेण्यात आली. या हल्ल्यामध्ये अतुल शिरसाट व शरद काकुळीथ, जखमी



झाल्याने त्यांना उपचारार्थ रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत धुळे पश्चिम देवपूर पोलीस ठाणे येथे एफ.आय.आर. नोंदवण्यात आली मात्र आवश्यक ते कलम लावण्यात आले नाही एक प्रकारे या आरोपींना पाठबळ देण्याचे काम पोलीस प्रशासनाने केल असल्याचा आरोप आजी-माजी सैनिकांच्या वतीने करण्यात आला आहे. तरी या आरोपींवर बांधविक कलम 395, 326, 307 हे कलम वाढवून तात्काळ अटक करावी अशी मागणी त्रिदल सैनिक सेवा संघाच्या वतीने आमरण उपोषणातून करण्यात आली आहे.

# दरेगाव ग्रा.पं.वर संदीप गायकवाड यांचे वर्चस्व

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील दरेगाव येथे झालेल्या ग्रामपंचायत निवडणूकिती एकूण चार पॅनल मध्ये लढत झाली. यामध्ये तरुण तडफडतदार ग्रामविकास पॅनलने बाजी मारली सरपंच पदासाठी संदीप गायकवाड यांनी 869 मत घेऊन विजय मिळवला यावेळी गावकऱ्यांनी मोठा जल्लोष केला तसेच संदीप गायकवाड यांनी निवडणूक दिल्याबद्दल गावकऱ्यांचे आभार व्यक्त केले व गावासाठी एकनिष्ठ राहून काम करेल असे आश्वासन दिले.






# नाताळ सोहळा उत्साहात संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** दिनांक २४ डिसेंबर रोजी संत जोसेफ हायस्कूल माळी घोगरगाव येथे नाताळ सण मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.

याप्रसंगी प्रमुख अतिथी सेंट फ्रान्सिस डिसेल्स शिक्षण संस्थेचे सदस्य रे. फा. विनोद शेळके रघुनाथ नगर येथील धर्मगुरू फा .मार्टिन क्रिस्टोफर माळी घोगरगाव येथील नवनिर्वाचित सरपंच ऋषिकेश साळुंके गावचे समाजसेवक रवींद्र पठाडे, सोपान साळुंके,डेक्कन प्रवीण वानखेडे तसेच सर्व सिस्टर्स, शाळेचे मुख्याध्यापक फा. आशिष मस्के, पर्यवेक्षक आर. पी. गिरनाळे प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक आर. जी. शिनगारे या सर्वांच्या उपस्थित कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मान्यवरांचे शाळेच्या विद्यार्थिनींनी लेझीमच्या तालात आरती द्वारे स्वागत केले. प्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वागत नृत्य, ख्रिस्त जन्म सोहळा नाटिका, गीत गायन नृत्य विविध कार्यक्रम सादर केले.शाळेमध्ये विद्यार्थ्यांचा वर्षभर सर्वांगीण विकाससाठी विविध स्पर्धा आयोजित केल्या जातात त्यांचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी फा. विनोद शेळके यांनी आपल्या मनोगतात शाळेचे कौतुक केले.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# वंजारी सेवा संघाच्या दशकपूर्ती व राज्यस्तरीय मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे : राहुल जाधवर

आधुनिक केसरी न्यूज

**रत्नागिरी :** वंजारी सेवा संघ महाराष्ट्र या राज्यातील अग्रगण्य सामाजिक संघटनेचा दशकपूर्ती सोहळा व राज्यस्तरीय वंजारी समाज मेळावा यावेळी रविवार दिनांक 1 जानेवारी 2023 रोजी वीर सावरकर नाट्यगृह रत्नागिरी येथे आयोजित करण्यात आलेला आहे. राष्ट्रधर्म, अध्यात्म व समाजसेवा या ब्रीदवाक्य प्रमाणे संघटनेचे बिगरराजकीय स्वरूपाचे सामजिक काम मागील दहा वर्षापासून राज्याच्या 36 जिल्ह्यात सुरू आहे. सविस्तर असे की वंजारी सेवा संघ महाराष्ट्र या संघटनेची स्थापना सन 2012 साली श्री क्षेत्र भगवानगड येथे करण्यात आली होती. राष्ट्रसंत भगवान बाबा संत वामनभाऊ संत आवजीनाथ महाराज व लोकनेते वसंतराव नाईक साहेब ,लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेब यांना आदर्श मानून संघटनेने राज्यातील प्रत्येक जिल्हा व तालुक्यात आपल्या कार्यकारिणीचा विस्तार करून वंजारी समाजाला संघटित करण्याचे काम केले आहे. संघटनेत शासकीय निमशासकीय कर्मचाऱ्यांसोबत सामाजिक, वैद्यकीय उद्योग, कला, साहित्य क्षेत्रात काम करणारे समाजबांधव मोठ्या प्रमाणात सक्रिय आहेत. मागील दहा वर्षात संघटनेने श्री क्षेत्र भगवानगड, बार्शी, नवीमुंबई, औरंगाबाद, आळंदी, बीड, लातूर, जालना, पुणे, नागपूर, नंदुरबार, वर्धा, परभणी, हिंगोली, रत्नागिरी, नाशिक या शहरात समाज मेळाव्याचे आयोजन केले आहे. मागील काही वर्षात संघटनेने समाजातील गुणवंतांचा सत्कार, नवनियुक्त अधिकारी वर्गाचे सत्कार,युवकांना रोजगार व व्यवसायासाठी मार्गदर्शन, वधू वर परिचय मेळावा, रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. सोबतच भटके विमुक्त- ओबीसी चळवळीत सक्रिय सहभाग नोंदवणे, महाज्योतीच्या प्रश्नावर राज्यभरात निवेदन देणे अशा प्रमुख विषयावर महत्त्वपूर्ण भूमिका निभावली आहे.वंजारी सेवा संघ संघटनेला यावर्षी दहा वर्ष पूर्ण झाले आहेत त्या निमित्ताने दशकपूर्ती सोहळा व समाज मेळावा रत्नागिरी येथे मान्यवरांच्या उपस्थित आयोजित केला आहे.

अध्यक्षस्थानी माजी आमदार गोविंद अण्णा केंद्रे राहणार आहेत तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून भटके विमुक्त चळवळीचे अभ्यासक तथा सदस्य निती आयोग भारत सरकार श्री दादा इदाते, ओबीसी चळवळीचे मार्गदर्शक माजी आमदार डॉ नारायण मुंडे, माजी आमदार तोताराम कायंदे, भगवान सेनेचे सरसेनापती श्री.फुलचंद कराड, माजी उपनगराध्यक्ष डॉ दिपाताई गीते मॅडम, ओबीसी राष्ट्रीय समन्वयक श्री राजेंद्र राख व ओबीसी राज्य समन्वयक श्री अरुण खरमाटे यांची उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात भटके विमुक्त चळवळ व लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब" या विषयावर श्री दादा इदाते, तर ओबीसी चळवळ व वंजारी समाज या विषयावर माजी आमदार डॉ. नारायण मुंडे यांचे मार्गदर्शन होणार आहेत.




या कार्यक्रमाचे आयोजन वंजारी सेवा संघाच्या कोकण विभागीय कार्यकारिणीने केले असून प्रदेश उपाध्यक्ष प्रा डॉ शंकर मुंडे , कोकण विभागीय अध्यक्ष श्री मोहनराव नागरगोजे ,प्रदेश संघटक श्री नितीन गर्जे ,प्रदेश सल्लागार श्री राजेंद्र धात्रक रत्नागिरी जिल्हाध्यक्ष श्री नागेश जाधवर, सिंधुदुर्ग जिल्हाध्यक्ष प्रा अच्युतराव वणवे ,रायगड जिल्हाध्यक्ष श्री गोरख आघाव यांच्यासह कोकण विभागातील सर्व पदाधिकारी व समाज बांधव यांनी केले आहे. या कार्यक्रमाला बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन वंजारी सेवा संघाचे संस्थापक प्रदेशाध्यक्ष राहुल जाधवर, प्रदेश कार्याध्यक्ष देवेंद्र बारगजे, प्रदेश महासचिव बाजी दराडे,प्रदेश उपाध्यक्ष श्री अमोल कुटे, महिला आघाडीच्या प्रदेश अध्यक्ष डॉ.मंजुषाताई दराडे, महिला प्रदेश कार्याध्यक्ष सविताताई मुंडे, युवा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रकाश आव्हाड, युवा प्रदेश कार्याध्यक्ष नितीन सांगळे, मुंबई ठाणे विभाग अध्यक्ष श्री बाळाजी केंद्रे, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्री मानसिंगराव माळवे, मराठवाडा अध्यक्ष ॲड. संजय काळबांडे, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष ज्ञानेश्वर शिरसाट, पूर्व विदर्भ अध्यक्ष प्रा शेषराव खार्डे, पश्चिम विदर्भ अध्यक्ष विष्णू डिघुळे यांच्यासह वंजारी सेवा संघाचे प्रदेश सरचिटणीस संघटन श्री बिभीषण पाळवदे सूर्यकांत मुंडे, प्रदेश उपाध्यक्ष श्री सुधाकर मुंडे, विशालजी बुधवंत, संतोष ताठे, डॉ. अमोल गीते, अनिल काहाळे, भाऊसाहेब मिसाळ, प्रा. डॉ. शंकर मुंडे, अभिनय गिते, भास्कर लहाने, प्रदेश संपर्क प्रमुख श्री भाऊसाहेब घुगे, डॉ कांचनकुमार चाटे, संभाजीराव शिरसाट, प्रा. बाजीराव काकड, प्रा. गुणवंत जाधवर, दिनेश केकान, डॉ अमोल कुटे, राजेंद्र दराडे पाटील, लक्ष्मणराव उगलमुगले, सुग्रीव मुंडे, प्रदेश सहसचिव प्रा. डॉ. विठ्ठल घुले, आनंद संखे, शामराव गीते, डॉ. नारायण जायभाये, प्रदेश प्रवक्ते प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये, ॲड. संजय काळबांडे, बाळाजी केंद्रे, प्रदेश चिटणीस प्राचार्य विक्रम बोडखे, गजानन डोईफोडे, अरुण खरमाटे, शिवाजी बडे, प्रदेश संघटक भास्करराव बोदर, धनंजय मुंडे, देविदास पेटकर, नितीन गर्जे, रामभाऊ साठे, प्रदेश सहसंपर्क प्रमुख चंचल साळवे, प्रा. नरेंद्रकुमार सोनुने, प्रदेश सोशल मीडिया प्रमुख जितेंद्र ढाकणे प्रदेश प्रसिद्धी प्रमुख संतोष कांदे, बाळासाहेब जाधवर,प्रदेश कार्यालय प्रमुख माणिक शिरसाट, प्रदेश कार्यकारिणी सदस्य रवींद्र दराडे, सिद्धेश्वर मुंडे, लक्ष्मण मिसाळ, विनायकराव बडे, अभिजित माळवे यांनी केले आहे.



## साहित्यलेणी प्रतिष्ठानचे रंगले कविसंमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**पणजी :** ताळगाव येथील साहित्यलेणी प्रतिष्ठनने पणजीतील कला आणि संस्कृती संचालनालयाच्या सभागृहात लिहिणाऱ्या हातांचा उत्सव या उपक्रमात राज्यस्तरीय कविसंमेलनाचे आयोजन केले होते उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी इन्स्टिट्यूट मिनेझिस ब्रागांझाचे अध्यक्ष दशरथ परब होते. गोवा विधानसभेचे माजी उपसभापती शंभू भाऊ बांदेकर खास निमंत्रित म्हणून उपस्थित होते. कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कवी माधवराव सटवाणी होते. माधव सटवाणी यांनी सर्व कवींच्या कवितांचा थोडक्यात आढावा घेतला व भाष्य केले. कविता ही आतून यावी लागते ती मनात सुचली की लिहिली असे न करता तिला मनात रुजू द्यावे, मुरू द्यावे असे ते म्हणाले. आसावरी कुलकर्णी हिने सूत्रसंचालन केले. चित्रा प्रकाश क्षीरसागर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रकाश क्षीरसागर यांनी आभार मानले. या कविसंमेलनात शंभू भाऊ बांदेकर - शब्द, रेखा पौडवाल - मी सजीव आहे, स्वप्ना धुपकर - आठवणी, दीपा मिरिंगकर - कोरा कॅन्व्हास, अपूर्वा ग्रामोपाध्ये - उन्मुक्त, गुलाब वेर्णेकर - मी एक स्त्री, सविता सामंत - वर्षाव चांदण्याचा, चंद्रशेखर गावस - गझल, मोहन कुलकर्णी - सृष्टी नाईक - माझी भूमी, विश्वनाथ जोशी - राजकारणावरील कविता, गौरी भालचंद्र -दुसरी कात, इंदू परब - हरवलेले, तृप्ती बांदेकर - झुंजूमूंजू, प्रकाश क्षीरसागर - एवढ्याने पोट का भरणार आहे ही गझल, प्रिया कालिका बापट - रे मना, विनोद नाईक - तळे, चित्रा क्षीरसागर - वसा सावित्रीचा, दुर्गाकुमार नावती - डोंबाऱ्याचा खेळ, शर्मिला प्रभू - गंधलेली, प्रमोद कारापूरकर - जनी दळता दळण, आसावरी कुलकर्णी - ऋतू स्वच्छंद, दशरथ परब - प्राजक्त गंध ओले, सुरेश कामत, माधव सटवाणी - थेंब, तो कुणीतरी आणि पायवाटेतले दगड आदी कविता सादर केल्या. या कविसंमेलनास संपूर्ण गोव्यातून कवी आणि कवयित्री उपस्थित होत्या.

## कवयित्री कल्पना गायकवाड 'अष्टपैलू काव्य भूषणगौरव' पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज



**अमरावती :** धारणी येथील प्रसिद्ध कवयित्री कल्पना संजय गायकवाड यांना पुणे येथील अष्टपैलू संस्कृती कला अकादमी मुंबई या प्रतिष्ठित साहित्य मंचातर्फे देवस्थ सभागृह आळंदी येथे झालेल्या एका भव्य साहित्यिक कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते "अष्टपैलू काव्यभूषण गौरव हा पुरस्कार देऊन नुकतेचं दि.२५ डिसेंबर २०२२ ला सन्मानीत करण्यात आले. कल्पना संजय गायकवाड यांचे मुर्तिजापूर माहेर असून,त्या बालपणापासूनच कवितेकडे आकर्षित झाल्या.बाल्यावस्थेपासूनचं वाचन,लेखन, गायन,वक्तृत्व यांची आवड असल्यामुळे, त्या साहित्यिक क्षेत्राकडे आकर्षित झाल्या व आपल्या काव्यलेखनातून त्या गृहिणी असल्यातरी त्यांचे शिक्षक पती श्री. संजय ज.गायकवाड यांच्या प्रेरणेने,त्या अंधश्रद्धा निर्मुलन,स्त्रीशिक्षण,शेतकरी जीवनाची दैन्यावस्था,बेरोजगारी,महागाई वाढती लोकसंख्या,भ्रष्टाचार निर्मुलन, स्वच्छता,स्त्रियांवरील अन्याय अत्याचार, असे अनेक तळमळीचे विषय त्यांनी आपल्या असंख्य कवितेतून आजपावेतो मांडले आहेत.त्यामुळे सर्व महाराष्ट्रला सौ.कल्पना गायकवाड सुपरिचित झाल्या आणि आजपावेतो त्यांना "अस्तित्व बहुउदेशीय सेवाभावी संस्था धारणी, जि.अमरावती व अश्या ब-याच मंचांततर्फे काव्य पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले आहे.

## मक्रणपूर येथील रावजी सांडु नागरे यांचे निधन



आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील मक्रणपुर येथील रावजी सांडु नागरे यांचे अल्पशा आजाराने मंगळवारी रात्री २ वा निधन झाले आहे. त्यांची अंत्यविधी बुधवार रोजी मक्रणपूर येथील स्मशान भुमित करण्यात आले. यावेळी शोकाकुल पत्नी शांताबाई नागरे, मुलगा आशोक नागरे, मुलगा किशोर नागरे, सुना नातवंडे असा परीवार आहेत. सकाळी १२ वाजता करण्याचे योजले आहे.

# सेवा आरोग्य फाऊंडेशनच्या कार्याने भारावले अनिवासी भारतीय

## विविध देशांतील पुणेकरांनी घेतली सेवावस्तींमधील आरोग्य उपक्रमांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** नाताळच्या सुट्टीच्या निमित्ताने स्वदेशी आलेल्या विविध देशांतील हिंदू स्वयंसेवक संघाच्या २७ प्रतिनिधींनी सेवा आरोग्य फाऊंडेशन या सेवाभावी संस्थेच्या आरोग्यविषयक प्रकल्पांना भेट दिली. यावेळी विविध वस्त्यांमधील कार्य पाहून भारावून जात दरवर्षी असे एकत्रीकरण व्हावे त्या द्वारे कार्यकर्ता जोडणीत आपण सहभागी होऊ अशी प्रतिक्रिया या प्रतिनिधींनी व्यक्त केली. सुट्टी असूनही सेवाकार्याची माहिती घेण्यास उत्सुकता आणि सक्रीय सहभाग घेत परदेशात राहूनही भारतीय संस्कृतीशी आपली नाळ घट्ट असल्याचे या प्रतिनिधींच्या भेटीतून जाणवले. अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, ऑस्ट्रेलिया, बहारीन, आयर्लंड, नायजेरिया, इंडोनेशिया, न्यूझिलंड, थायलंड आदि विविध देशांत काम करणारे मूळ पुण्याचे नागरिक सुट्टीनिमित्त येथे आले आहेत. या दरम्यान सेवा आरोग्य फाऊंडेशनचे वस्त्यांमधील समृद्धी वर्ग, किशोरी मुलींसाठी 'घे भरारी' तसेच सेवा वस्तीतील अल्पदरात चालणाऱ्या आरोग्य केंद्रांची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी करत माहिती घेतली.

सेवा आरोग्य फाऊंडेशन या सेवाभावी संस्थेची स्थापना २०१६ मध्ये झाली. संस्थेच्या वतीने विविध वस्त्यांमधून होतकरू नागरिकांसाठी अल्पदरात विविध ठिकाणी २० दवाखान्यांद्वारे रुग्णसेवा दिली



जाते. महिलांची हिमोग्लोबिन तपासणी, आरोग्य समुपदेशन, आरोग्य शिबिर, हाडांची ठिसूळता तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया या सेवा उपलब्ध करून दिल्या जातात. या ठिकाणी डॉ. वरूण कुलकर्णी, डॉ. आशुतोष जातेगावकर, डॉ. कल्याणी संत, डॉ. देवाशिष उंबरजकर तसेच मधू गोठे, गीता कळसकर, तेजश्री वाळुंजकर, आशा पुजारी आणि त्यांचे सहकारी रुग्णसेवा करतात. याप्रसंगी किशोरवयीन मुलींसाठी चालविण्यात येणाऱ्या 'घे भरारी' या उपक्रमांतर्गत विविध प्रकल्प आणि वस्त्यांमधील दवाखान्यांची माहिती सेवा आरोग्यचे संचालक प्रदीप कुंटे यांनी परदेशस्थ भारतीयांना दिली. तसेच कर्वेनगर भागातील बौद्ध विहार येथे चालणाऱ्या समृद्धी वर्गाची माहिती संचालक डॉ. सतीश जोशी यांनी दिली. मुलांवर संस्कार, हिंदू संस्कृती, राष्ट्रपुरुषांविषयी माहिती, देशभक्तीची भावना निर्माण व्हावी म्हणून समृद्धी वर्गात आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांविषयीही त्यांनी माहिती दिली.